




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४३ ■ शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







# विधानसभा, संसदेत एलपीजी मुद्यावर विरोधकांचा गदारोळ

प्रतिनिधी १३ मार्च

**नवी दिल्ली / मुंबई :** संसदेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुक्रवारी ५वा दिवस आहे. आजही विरोधी पक्षांचे खासदार देशभरात एलपीजीच्या वाढत्या किमतींवरून सभागृहात गदारोळ करू शकतात. गुरुवारी सरकारने सभागृहात एलपीजी आणि तेलाची टंचाई तसेच वाढत्या किमतींवरून विरोधकांच्या आरोपांना उत्तर दिले होते.पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी म्हणाले की, देशात पेट्रोल, डिझेल, रॉकेल किंवा एव्हिएशन टर्बाइन इंधन यांची कोणतीही कमतरता नाही. सरकारने विरोधकांनाही आवाहन केले की, या मुद्द्यावर अफवा आणि खोटे कथन पसरवू नये. मुंबईत ही विधानसभेत एल पी जी च्या मुद्यांवरुन विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली.

## वाढत्या किमतींवरून आंदोलन







लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या चिंतांना उत्तर देताना पुरी म्हणाले की, सरकारची पहिली प्राथमिकता ३३ कोटींहून अधिक कुटुंबांच्या, विशेषतः गरीब आणि वंचित वर्गाच्या, स्वयंपाकघरात गॅस पोहोचवणे आहे. ते म्हणाले की, घरगुती पुरवठा पूर्णपणे सुरक्षित आहे आणि गॅसच्या वितरण चक्रात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

काँग्रेस खासदार शशी थरूर म्हणाले, 'पेट्रोलियम मंत्र्यांच्या कालच्या विधानानुसार, पेट्रोल, डिझेल आणि रॉकेलचा पुरेसा पुरवठा आहे. असे दिसते की एलपीजी हा एक विशिष्ट क्षेत्र आहे जिथे तुटवडा आहे, कारण दुर्दैवाने, आपल्या स्वयंपाक प्रक्रियेचा एक मोठा भाग, विशेषतः ग्रामीण भागात, लाकूड आणि कोळशापासून सिलेंडर गॅसकडे वळत आहे. म्हणूनच, जर सिलेंडर सहज उपलब्ध नसतील तर ते एक मोठे आव्हान आहे. या समस्या लवकरात लवकर सोडवल्या जातील याची खात्री करण्यासाठी देशाने एकत्र आले पाहिजे.'

### लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब

रिजिजू म्हणाले, 'विरोधी पक्षाच्या खासदारांनी लवकरात लवकर सुधारणा करावी, अन्यथा जनता त्यांना कठोर शिक्षा करेल. विरोधी पक्षाचे सदस्य संसदेच्या आवारात अन्न आणि पेये घेऊन अत्यंत बेशिस्तपणा दाखवत आहेत.' रिजिजू बोलत असतानाही विरोधी पक्षाने निषेध सुरूच ठेवला. यानंतर संध्या राय यांनी अध्यक्षांकडून इशारा दिला, परंतु घोषणाबाजी सुरूच राहिली. परिणामी, कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

### लोकसभेत विरोधकांचा गोंधळ

विरोधकांनी 'नाम नरेंदर, काम सरेंडर'' असा जयघोष केला. लोकसभेत 'मोदी जी शर्म करो' च्या घोषणा देण्यात आल्या. दुपारी १२ वाजता लोकसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाले. संध्या राय अध्यक्षस्थानी आहेत. खासदार चर्चेसाठी विधेयके सादर करत आहेत. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस खासदार केसी वेणुगोपाल म्हणाले, 'ते वास्तवात जगत नाहीत. ते स्वप्नांच्या जगात जगत आहेत. आमच्या मतदारसंघातील लोकही खूप त्रस्त आहेत. देशाच्या राजधानीत लोक किती त्रास सहन करत आहेत हे आपण पाहू शकतो. या वास्तवाचा त्यांच्यावर परिणाम होत नाही कारण ते वेगळ्या जगात राहतात. राहुल गांधींनी या मुद्द्यांवर बोलावे असे त्यांना वाटत नाही.'

### तृणमूल महाभियोग प्रस्ताव आणणार

तृणमूल काँग्रेस (टीएमसी) शुक्रवारी संसदेच्या दोन्ही सभागृहात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणणार आहे. लोकसभेतील एकूण १२८ विरोधी खासदारांनी आणि राज्यसभेतील ६३ खासदारांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून काढून टाकण्याच्या मागणीच्या प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे. या प्रस्तावावर लोकसभेतील १०० सदस्यांनी किंवा राज्यसभेतील ५० सदस्यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. संविधानाच्या कलम ३२४(५) मध्ये असे म्हटले आहे की मुख्य निवडणूक आयुक्तांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना काढून टाकण्याच्या प्रक्रियेप्रमाणेच आणि त्याच आधारावर काढून टाकता येते.

## सीईटी' प्रवेश परीक्षा २४ मार्चपासून

प्रतिनिधी १३ मार्च

**मुंबई :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी घेतल्या जाणारी एलएलबी ३ वर्ष आणि ५ वर्ष, बी. एड्. (जनरल व स्पेशल) व बी. एड्. (इएलसीटी), बीपीएड्, एम. एड्., एमपीएड् व बी. एड्. एम. एड्. या सात अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेच्या अंतिम तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार यंदा सीईटी परीक्षांना २४ मार्चपासून सुरुवात होत आहे. विद्यार्थ्यांना त्यानुसार परीक्षेचे नियोजन करता येणार आहे.

सीईटी सेलने तारखा जाहीर केलेल्या सात अभ्यासक्रमांपैकी सहा प्रवेश परीक्षांची प्रवेश नोंदणी पूर्ण झाली आहे. यातील एलएलबी ५ वर्षे अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेची नोंदणी १५ मार्चपर्यंत सुरू आहे. या परीक्षा १७ मेपर्यंत घेण्याचे नियोजन आहे. दरम्यान, सीईटी सेल मार्च, एप्रिल आणि मे या तीन महिन्यांतील ४५ दिवसांच्या कालावधीत या प्रवेश परीक्षा घेणार आहे. सद्यस्थितीत सर्व १७ प्रवेश परीक्षांना मिळून १२ लाख ९४ हजार ४०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, दोन्ही संधी मिळून १७ लाख ४२ हजार ०६० विद्यार्थी प्रवेश परीक्षा देणार आहेत. विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने ही परिक्षा अत्यंत महत्वाची मानली जाते.

## सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्यभर नियंत्रण कक्ष, जिल्हास्तरीय समित्या स्थापन

अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने
राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही

प्रतिनिधी १३ मार्च



**मुंबई :** इराण - इस्त्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठ्याबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत. मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत.

### पर्यायी इंधनाची शक्यता तपासण्याचे निर्देश

◆ पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.




सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## विभागीय आयुक्तालयात यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**अमरावती** : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

राज्याच्या प्रगतीसाठी यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या कार्याची आठवण करुन देत, त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला. वनसंरक्षक आदर्श रेड्डी, अपर आयुक्त सुरज वाघमारे, उपायुक्त रविंद्र जाधव, संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# उष्णतेची तीव्रता वाढली; नागरिकांनी आवश्यक काळजी घ्यावी

### ♦ आयुक्त सौम्या शर्मा चांडक व डॉ. विशाल काळे यांचे आवाहन

प्रतिनिधी १३ मार्च

**अमरावती:** शहरात मागील काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून उष्णतेची तीव्रता जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

सध्या उन्हाळ्याचा कडाका वाढत असून दुपारच्या वेळेत सूर्याची तीव्रता अधिक असते. त्यामुळे दुपारी १२ ते ३ या वेळेत



शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे प्रशासनाने सांगितले आहे. अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर जाणे टाळावे. जर बाहेर जाणे आवश्यक असेल तर डोके झाकण्यासाठी टोपी, कॅप, गॉगल किंवा ओढणीचा वापर करावा. तसेच हलक्या रंगाचे आणि सैल सूती कपडे परिधान केल्यास शरीरावर उष्णतेचा परिणाम कमी होण्यास मदत होते.

नागरिकांनी दिवसाभरात पुरेशा प्रमाणात पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास थकवा, चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे नियमित अंतराने पाणी पिणे, तसेच ओआरएस, लस्सी, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारखे द्रव पदार्थ सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. मद्यपान, जास्त प्रमाणात चहा-कॉफी तसेच कार्बोनेटेड पेये यांचे सेवन टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते.

उन्हात काम करणाऱ्या मजुरांनी, बांधकाम कामगारांनी तसेच रस्त्यावर काम करणाऱ्या व्यक्तींनी वेळोवेळी सावलीत विश्रांती घ्यावी. दीर्घकाळ थेट उन्हात काम करणे टाळावे. कामाच्या दरम्यान डोके व चेहरा ओल्या कापडाने झाकल्यास उष्णतेपासून काही प्रमाणात संरक्षण मिळू शकते. शक्य असल्यास सकाळी किंवा सायंकाळी काम करण्यास प्राधान्य द्यावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच आधीपासून आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. अशा व्यक्तींना उष्णतेचा त्रास होण्याची शक्यता अधिक असल्याने त्यांना थेट उन्हात जाणे टाळावे. घरात थंड आणि हवेशीर वातावरण ठेवावे तसेच शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम ठेवण्यावर भर द्यावा.

उष्माघाताची काही लक्षणे दिसल्यास त्वरित सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीस चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ, उलटी, जास्त घाम येणे, अशक्तपणा किंवा बेशुद्धी जाणवत असल्यास त्याला त्वरित सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे. त्या व्यक्तीचे कपडे सैल करावेत आणि शरीरावर थंड पाणी टाकून शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच त्याला पाणी, ओआरएस किंवा इतर द्रव पदार्थ द्यावेत.

परिस्थिती गंभीर वाटल्यास संबंधित व्यक्तीस तातडीने जवळच्या शासकीय किंवा खासगी आरोग्य केंद्रात दाखल करावे, जेणेकरून वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकतील. उष्णतेमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

शहरातील नागरिकांनी उष्णतेच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

# अवैध दारू पकडली

प्रतिनिधी १३ मार्च

**अमरावती** : पोस्ट फ्रेजरपुरा हद्दी मध्ये गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहिती वरून आरोपी कमला वामनराव चाचरकार वय ६५ वर्ष ,रा भोईपुरा वडाळी अमरावती यांच्या घरात हात भट्टी दारू काढताना मिळून आली वरून



त्यांच्याकडून हात भट्टी दारू लिटर ५५ व मोहमास सडवा ९० लिटर आणि इतर साहित्य जागीच नष्ट केले.असा एकूण ४१५५० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांच्या विरुद्ध पो.स्टे.फ्रेजरपुरा येथे कलम ६५(क)(फ)(ड) म.दा.का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

# खेळाडूंसाठी 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली कार्यान्वित

### ♦ आता घरबसल्या मिळणार प्रमाणपत्र

प्रतिनिधी १३ मार्च

**अमरावती** : महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळवून देण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित या प्रणालीमुळे आता खेळाडूंना त्यांचे आरक्षण प्रमाणपत्र घरबसल्या प्राप्त करता येणार असून, यामुळे बोगस प्रमाणपत्रांच्या प्रकारांना पूर्णपणे आळा बसेल, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिली आहे.

ही नवीन प्रणाली ब्लॉकचेन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे. यामध्ये खेळाडूने माहिती भरल्यानंतर आणि ती मूळ डेटाशी जुळल्यास, अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होतो. प्रत्येक प्रमाणपत्रावर एक अद्वितीय कोड असेल, ज्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा पोलीस भरती यांसारखे नियुक्ती प्राधिकारी प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील. विशेष म्हणजे, आगामी सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता या 'क्रीडा ई-प्रमाणपत्रा'ची प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणपत्र पडताळणी केली आहे, त्यांनाही आता नवीन प्रणालीद्वारे हे डिजिटल प्रमाणपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे.

या सुविधेचा लाभ घेण्यासाठी खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला (https://sports.maharashtra.gov.in/) भेट देऊन 'Our Services' मधील '5% Reservation' या टॅबमध्ये नोंदणी करावी. नोंदणीसाठी आधार-संलग्न मोबाईल क्रमांक, वैध ई-मेल आयडी, आधार कार्ड आणि क्रीडा स्पर्धेत प्राप्त प्रावीण्य प्रमाणपत्र (PDF स्वरूपात) आवश्यक आहे. ज्या खेळाडूंची माहिती किंवा प्रमाणपत्रे तांत्रिक कारणास्तव प्रणालीवर दिसत नसतील, त्यांनी support@kridaepramaan.org या ई-मेलवर आपली तक्रार नोंदवावी. सध्या कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५), ज्युडो (२०२४) आणि कुराश (२०१७-१८ व २०२४-२५) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध असून इतर खेळांचे अभिलेख अपलोड करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असेही क्रीडा विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

# ई-केवायसी न केल्याने 'लाडकी बहीण' योजनेतील २५ हजार महिलांचा लाभ बंद

### ♦ निकषांची कडक अंमलबजावणी; 'नो रिमार्क' पर्याय निवडल्याने अनेक अर्ज रद्द

प्रतिनिधी १३ मार्च

**अमरावती :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे जिल्ह्यातील सुमारे २५ हजार महिलांचा लाभ बंद झाला आहे. अर्ज करताना काही महिलांनी 'नो रिमार्क' हा पर्याय निवडल्यामुळे त्यांच्या अर्जातील रिमार्क आणि स्टेटस रिजेक्ट दाखवण्यात आले आहेत.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी महायुती सरकारच्या काळात सुरू झालेल्या या योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. सुरुवातीला अनेक महिलांनी या योजनेसाठी अर्ज केले. मात्र नंतर शासनाने पात्रतेचे निकष कडकपणे लागू केले. त्यामुळे ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या महिलांना लाभ मिळणे थांबले आहे.

ई-केवायसी करताना 'नो रिमार्क' हा पर्याय निवडल्यामुळे लाभार्थ्यांच्या अर्जात गोंधळ निर्माण झाला. त्यामुळे त्यांचे अर्ज रद्द झाले. या महिलांना पुन्हा संधी देण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाने शासनाकडे मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव पाठवला आहे.

महायुती सरकारने सुरू केलेली ही योजना अनेक महिलांसाठी आर्थिक आधार ठरली आहे. मात्र ई-केवायसी प्रक्रिया न झाल्यामुळे अनेक महिलांचा लाभ बंद झाला असून त्या आता सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या मारत आहेत.

**काय आहेत निकष?**

ज्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे, सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ किंवा स्थानिक संस्थेत नियमित कर्मचारी आहेत किंवा निवृत्तीवेतन घेत आहेत, तसेच इतर योजनांमधून दरमहा १५०० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त आर्थिक लाभ घेतात, अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही.

तसेच कुटुंबातील सदस्यांच्या नावावर चारचाकी वाहन (ट्रॅक्टर वगळून) असल्यास त्या महिलांनाही अपात्र ठरवले जाते.

अशी होती लाभार्थी संख्या :

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे जिल्ह्यात सुरुवातीला ५७०६४२ लाभार्थी होते. सध्या पोर्टलवर ५०३९०८ महिला लाभार्थी दिसत आहेत.

# मनपात माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण जयंती साजरी

प्रतिनिधी १३ मार्च

**अमरावती :** गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्राचे पहिले माजी मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अमरावती महानगरपालिकेत हारार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मा. महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या हस्ते विश?वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, सभागृह नेते चेतन गावंडे, सन्माननीय नगरसेवक मिलिंद चिमोटे, सन्माननीय नगरसेविका सौ. सुरेखा लुंगारे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त



योगेश पिठे, मुख्य लेखापरीक्षक श्यामसुंदर देव, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भूषण खडेकार, शिवा फुटाणे तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण (१९१३–१९८४) हे प्रगल्भ नेते, थोर साहित्यिक आणि प्रभावी वक्ते म्हणून ओळखले जात होते. महाराष्ट्राच्या घडणीत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दूरदृष्टीने कार्य केले. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचे 'भाग्यविधाते' म्हणूनही संबोधले जाते. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या आधुनिक आणि प्रगत राज्याच्या उभारणीचा मजबूत पाया रचला गेला.

# १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही लस; अमरावतीतील १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये लसीकरण सुरू

प्रतिनिधी १३ मार्च

**अमरावती:** बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याने आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील १४ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींना एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) प्रतिबंधक लस मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेमुळे शहरातील मोठ्या संख्येने मुलींना थेट लाभ मिळणार आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमधील गंभीर व जीवघेणा आजार मानला जातो. मात्र, योग्य वेळी एचपीव्ही लसीकरण केल्यास या कर्करोगापासून प्रभावी संरक्षण मिळू शकते. खासगी रुग्णालयांमध्ये ही लस महागड्या दरात उपलब्ध असली तरी आता शासकीय स्तरावर मोफत लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अमरावती महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये ही लस दिली जाणार असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तज्ज्ञांच्या मते, योग्य वयात एचपीव्ही लस घेतल्यास भविष्यात गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण वेळेत करून घ्यावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. या मोहिमेसाठी वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**अमरावती** : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे,



अधीक्षक निलेश खटके यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# अमरावतीत १०० मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी इमारतीची आवश्यकता

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य इतर मागास बहुजन कल्याण विभागाद्वारे अमरावती येथे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील १०० विद्यार्थ्यांसाठी नवीन मुलांचे वसतिगृह सुरू करण्यात येत आहे. या वसतिगृहासाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी अंदाजे ९२०० चौरस फूट बांधकाम असलेली इमारत भाड्याने हवी असून, इच्छुक इमारत मालकांनी १५ दिवसांच्या आत अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सहायक संचालक सरीता बोबडे यांनी केले आहे. अमरावती शहरातील स्थानिक इच्छुक इमारत मालकांनी विहित नमुन्यातील अर्ज 'सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, अमरावती, सामाजिक न्याय भवन, पोलीस आयुक्तालयाच्या मागे, चांदूर रेल्वे रोड, अमरावती' या कार्यालयात सादर करावयाचे आहेत. या कार्यालयाचा ईमेल आयडी adobbwoamravati@gmailed.comed हा आहे.

# शिक्षिकेचा मोबाईल हॅक करून अश्लील फोटोद्वारे ब्लॅकमेल!

### ♦ व्हिडिओ कॉल करून विवस्त्र होण्याची अन् शरीर संबंधांसाठी धमकी

प्रतिनिधी १३ मार्च

**बुलढाणा** : बुलढाणा जिल्ह्यातून सायबर गुन्हेगारी आणि महिलेला धमकावत विवस्त्र व्हिडीओ कॉल करायला लावणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका २७ वर्षीय शिक्षिकेचा मोबाईल हॅक करून, त्यातील खासगी डेटा चोरून त्यांना विवस्त्र होण्यास भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सोनाळा पोलिसांनी ऋषिकेश गिरी (२७) नावाच्या आरोपीवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी ऋषिकेश गिरी याने पीडित शिक्षिकेचा मोबाईल बेकायदेशीरपणे हॅक केला होता. हॅकिंगच्या माध्यमातून त्याने शिक्षिकेचे व्हॉट्स ॲप चॅट्स, ईमेल आणि गॅलरीमधील अत्यंत खासगी फोटो व व्हिडिओ स्वतःच्या ताब्यात घेतले. यानंतर खरा छळ सुरू झाला. 'तुझे हे सर्व फोटो आणि व्हिडिओ मी तुझ्या पतीला व नातेवाईकांना पाठवून तुझी बदनामी करेन,' अशी धमकी त्याने पीडितेला दिली. बदनामीच्या धाकाने पीडिता मानसिक तणावाखाली असताना, आरोपीने याचा गैरफायदा घेतला. त्याने शिक्षिकेला वारंवार व्हिडिओ कॉल करून विवस्त्र होण्यास भाग पाडले. नराधम ऋषिकेश एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने या व्हिडिओ कॉलचे स्क्रीन रेकॉर्डिंग करून ते पीडितेच्या बहिणीलाही पाठवले. जेव्हा पीडितेने विरोध केला, तेव्हा 'जर तू माझ्याशी शारीरिक संबंध ठेवले नाहीस, तर तुला आणि तुझ्या मुलाला ठार मारीन,' अशी जीवघेणी धमकी त्याने दिली.

सततचा छळ आणि मुलाच्या जिवाला असलेला धोका लक्षात घेता, पीडित शिक्षिकेने अखेर सोनाळा पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ कारवाई केली आहे. कलम ६७/२०२६ नुसार ७५(१),७५(२),७७, ७८,३५२,३५१(२),३५१ (३),३५६ (२) बीएनएस २०२३ सहकलम ६६(ई), ६७, ६७ (ए) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० नुसार तात्काळ गुन्हा दाखल केला आहे. सध्या आरोपी ऋषिकेश गिरी फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. सायबर सुरक्षेबाबत नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित महिलांना ई-केवायसी करण्याची संधी द्या

### ♦ गणेशभाऊ चौकसे यांचे निवेदन

प्रतिनिधी १३ मार्च

**खामगाव:** ई-केवायसी लिस्टमध्ये ज्या महिलांचे नांव नाही त्यांना पुन्हा ई-केवायसी करण्याची संधी मिळावी अशा मागणीचे निवेदन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुमित्राताई अजितदादा पवार यांना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी पाठविले आहे.

सदर निवेदनात नमूद केले आहे की, राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रेरणेतून महिलांचे सक्षमीकरण करण्याकरीता महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना राबविण्यात आली. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी करण्याची अट शासनाने लागू केली होती. परंतू अनेक महिला अशिक्षित असल्यामुळे त्यांना ई-केवायसी बाबत बँकेत विचारणा केली असता



तुमची ई-केवायसी झालेली आहे असे सांगण्यात आल्यामुळे त्या महिलांनी शासनाच्या लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवर ई-केवायसी केलेली नाही. तसेच काही महिला गरोदर असल्यामुळे त्या दवाखान्यात भरती होत्या व ग्रामीण भागातील महिला ह्या शेतीकामात व्यस्त होत्या. अशा विविध कारणांमुळे त्यांची ई-केवायसी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात आली नाही.

महाराष्ट्रातील अनेक दुर्गम भागात नेटवर्कचा प्रॉब्लेम असल्यामुळे ओटीपी न येणे किंवा सर्व्हर डाऊन असणे, विभक्त कुटुंब अशा अडचणी आहेत असेचौकसे यांचे म्हणणे आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांच्या मानधनात १००० रुपयांची वाढ

### ♦ १८ मार्चपर्यंत कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

प्रतिनिधी १३ मार्च

**खामगाव:** दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात १,००० रुपयांची वाढ करण्यात आली असून, आता लाभार्थ्यांना दरमहा २,५०० रुपये अनुदान डी.बी.टी. द्वारे थेट बँक खात्यात मिळणार आहे. मात्र, या वाढीव लाभासाठी लाभार्थ्यांनी आपले यूडीआयडी कार्ड पोर्टलवर अपडेट करणे अनिवार्य असून, १८ मार्च २०२६ पूर्वी आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन तहसीलदार कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.शासकीय निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ५ मार्च २०२६ रोजी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत समोर आलेल्या माहितीनुसार, खामगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेतील १८६९ आणि श्रावणबाळ योजनेतील ९० अशा एकूण १९५९ दिव्यांग लाभार्थ्यांचे 'युडीआयडी' आणि 'आधार कार्ड' अद्याप लिंक नसल्याचे दिसून आले आहे. या तांत्रिक बाबींमुळे संबंधित लाभार्थी वाढीव मानधनापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. दिव्यांग लाभार्थ्यांनी अनुदान वेळेवर मिळण्यासाठी खालील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जमा करणे आवश्यक आहे: दिव्यांग प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक पासबुक लाभार्थ्यांनी ही कागदपत्रे आपल्या गावातील तलाठी यांच्याकडे किंवा तहसिल कार्यालय, खामगाव (संजय गांधी योजना विभाग) येथे १८ मार्च २०२६ पूर्वी सादर करावीत. तसेच, लाभार्थ्यांनी यूडीआयडी पोर्टलवरून केवायसी पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन तहसीलदार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

वेळेत कागदपत्रे सादर न केल्यास डी.बी.टी. पोर्टलवर माहिती अपडेट होणार नाही, परिणामी वाढीव अनुदानाची रक्कम खात्यात जमा होण्यास अडचण येऊ शकते.

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २२ व्या हप्त्याचे वितरण

**अकोला:** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत डिसेंबर २०२५ ते माहे मार्च२०२६ कालावधीतील २२ व्या हप्त्याचा देय लाभ देशातील पात्र लाभार्थी शेतक-यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. देशस्तरीय कार्यक्रम गुवाहाटी येथील ज्योतीबिष्णू आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्र येथे दि.१३ मार्च रोजी सायंकाळी ५ वा. होईल. त्याचे थेट प्रक्षेपण जिल्ह्यात करण्यात येईल. त्याचप्रमाणे, https://pmiåiaeQcast.nic.in या लिंकद्वारे सहभागी होता येणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधव यांनी उपस्थित राहावे किंवा सहाय्यक कृषि अधिकारी यांच्यामार्फत गावात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवावी असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना व प्र. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हरिश देशमुख यांनी केले आहे.

## गुणवंत शिक्षिका भावना इटकीकर यांचा 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने गौरव

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** रामदापेठ येथील पी. एम. श्री. मनपा प्राथमिक सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. ७ च्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्यात शिक्षिका भावना अजय इटकीकर यांना शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रमिलाताई ओक हॉल येथे पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेश गावंडे आणि शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.





कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. या सोहळ्याला उद्घाटक म्हणून निकीताताई देशमुख उपस्थित होत्या. तसेच पोलीस अधिकारी गजानन शेळके, शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, संस्थेचे उपाध्यक्ष राजेश गावंडे, मनपा शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि शहरातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पुजनाने या बहारदार कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पुरस्कार प्राप्त शिक्षिका भावना इटकीकर यांनी स्वतः रचित आणि स्वरबद्ध केलेले स्वागतगीत सादर करून उपस्थित मान्यवरांचे शब्दांनी स्वागत केले, ज्याचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी इटकर यांनी केले, तर बहारदार सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षिका नयना कृष्णराव गोटे व अनिता नवलकार यांनी केले.विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या या स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनात राजेश गावंडे आणि शाळेतील संपूर्ण शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. भावना इटकीकर यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल शैक्षणिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कौलखेड येथे श्री गजानन महाराजांच्या पालखीचे भाविकांकडून उत्स्फूर्त स्वागत



**अकोला :** वनोजा ऋषीश्वर महाराज संस्थान येथून निघालेल्या संत श्री गजानन महाराजांच्या पवित्र पालखीचे कौलखेड येथे श्री भक्त परिवाराच्या वतीने मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात १२ मार्च २०२६ रोजी स्वागत करण्यात आले. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि गण गण गणात बोतेच्या जयघोषात संपूर्ण कौलखेड नगरी भक्तिमय वातावरणाने भारावून गेली होती.

गेल्या सुमारे २० वर्षांपासून श्री ऋषीश्वर संस्थान, वनोजा यांच्या वतीने वनोजा ते शेगाव अशी संत श्री गजानन महाराजांच्या पालखीची पायदळ वारी अखंडपणे आयोजित केली जाते. या परंपरेचा भाग म्हणून कौलखेड येथे दरवर्षी श्री भक्त परिवाराच्या वतीने पालखीचे स्वागत केले जाते. यावेळी पालखीतील श्रींच्या मूर्तीचे अकोला पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तसेच प्रसाद मोकळकर व आशिष मोकळकर यांच्या हस्ते विधीवत पूजन व आरती करण्यात आली.

## कुंभारी येथे छत्रपती शिवाजी महाराज स्वाभिमान समाधान शिबिराचे आयोजन

**अकोला :** शासनाच्या जनहितकारी उपक्रमांतर्गत नागरिकांच्या विविध महसुली व शासकीय सेवांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्यासाठी ग्राम पंचायत कार्यालय कुंभारी येथील प्रांगणात १४ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता'छत्रपती श्री शिवाजी महाराज स्वाभिमान समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराचे आयोजन उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले असून, या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी सुलभपणे उपलब्ध होणार आहेत. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शिवणी मंडळाचे मंडळ अधिकारी निखिल साठे यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाचे अधिकारी सक्रियपणे काम करत आहेत. यामध्ये ग्राम महसूल अधिकारी अमोल बाहकर, उल्हास इंदोरे, हे अधिकारी शिबिराच्या तयारीत व व्यवस्थापनात सहकार्य करीत आहेत.

## उन्हातान्हात प्रतीक्षा करणाऱ्यांना मिळाली सावली

### नगरसेवक निलेश देव यांचा पुढाकार

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला:** बिर्ला गेट रेल्वे उड्डाणपूल वापरात येईपर्यंत न्यू तापडिया नगर आणि या मार्गाने जाणाऱ्यांना यातना सहन कराव्या लागणार आहेत. रेल्वे गेट बंद राहिल्यास शेकडो लोक उन्हात चटके सहन करीत उभे राहतात. त्यांना सावली मिळावी म्हणून या भागातील नगरसेवक निलेश देव यांनी पुढाकार घेऊन गेटच्या दोन्ही बाजूला हिरवी नेट बांधून घेतली. त्यामुळे नागरिकांना सावली मिळाली.



रेल्वे गेट बंद राहिले तर लोकांची गर्दी वाढते. तसेच परिसरातील झाडे प्रत्येकाला सावली देऊ शकत नाहीत. हे भान ठेवून निलेश देव यांनी पुढाकार घेतला. ४१,४२ अंश सेल्सिअस तापमानाचा सामना लोकांना करावा लागेल ही जाणीव ठेवून हिरवी नेट लावून घेतली. लोकांनी देव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना धन्यवाद दिले. जयंत सरदेशपांडे, गणेश मैराळ, शैलेश देव आणि सहका-यांचा या मानवीय कार्यात सहभाग होता.

## भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा वतीने महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला:** भारतीय जनता पार्टी तर्फे जागतिक महिला दिन अकरा मार्च भाजपा कार्यालय साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ. राधिकाताई केळकर, वैशालीताई देशपांडे, (राष्ट्रसेविका समिती कार्यवाही ), स्वाती काचकर (बचत गट उद्योजिका) या होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुहासिनीताई धोत्रे, प्रमुख उपस्थिती गंगाताई शर्मा, मंजुषाताई सावरकर, समीक्षा ताई धोत्रे, महापौर सौ शारदाताई खेडकर,सौ अर्चनाताई शर्मा, सौ सुनीता अग्रवाल, सौ सीमाताई पाटील, सौ.आरतीताई शर्मा,





महिला अध्यक्ष वैशालीताई शेळके, सौ चंदाताई शर्मा, सौ. ऋचा शहा (पाटील), सौ आरती घोगलिया, (महिला व बालकल्याण सभापती) सौ. रश्मी अवचार (झोन सभापती) यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

डॉ. राधिका केळकर म्हणाल्या, मानसिक आरोग्याची काळजी आजारपण झाल्यावर नव्हे, तर त्याच्या खूप आधीपासून सुरू व्हायला हवी. सौ स्वाती काचकर महिला उद्योजिका यांनी बचत गटा मार्फत आपण कशाप्रकारे घरगुती वस्तूंपासून कशाप्रकारे उद्योग करू शकतो हे सांगितले. सौ वैशालीताई देशपांडे यांनी महिलांना राष्ट्रप्रेम, आणि महिला स्वसंरक्षण कशाप्रकारे करावे याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात चालता बोलता सारखे प्रश्नावली ममता सारडा यांनी घेतली आणि महिलांना बक्षीस देऊन त्यांचे बौद्धिक आणि मनोरंजनात्मक प्रश्न विचारून महिलांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेविका यांचा सत्कार घेण्यात आला. सुहासिनीताई धोत्रे यांनी महिलांना 'महिला सशक्तीकरण हा समाज विकासाचा मार्ग आहे' असा संदेश दिला. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ निकीता देशमुख,सौ निशा कढी यांनी तर आभार प्रदर्शन सौ गायत्री गोगे यांनी केले.

## दिल्लीच्या राष्ट्रीय महोत्सवात गोपाल गाडगे सन्मानीत

प्रतिनिधी १३ मार्च

**पातूर:** केंद्रीय ऊर्जा प्राधिकरणच्या पुढाकाराने आयोजित राष्ट्रीय लाईनमन दिवस हा राष्ट्रीय महोत्सव नवी दिल्ली येथे पार पडला.या सोहळ्यात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी महाराष्ट्रातून चार प्रतिनिधीची निवड करण्यात आली होती.यामध्ये अमरावती परिमंडळातून अकोला विभागातून गोपाल गाडगे यांची निवड करण्यात आली होती. त्यांना केंद्रीय ऊर्जा मंत्री यांच्या उपस्थितीत पदक, सन्मानपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.



गोपाल गाडगे अकोला विभागाच्या २२० के.व्ही. उपकेंद्र, मालेगाव (झोडगा) येथे उपमुख्य तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी अमरावती परिमंडळाला मिळाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वारखेड परिसरातील शेतात लागली अचानक आग

### आगीचे प्रमाण वाढले शेतकरी हतबल

प्रतिनिधी १३ मार्च

**हिवरखेड:** नजीकच्या सौन्दळा येथील शेतकरी गजानन गोतमारे यांच्या वारखेड शिवारातील शेतातील एक एकर क्षेत्रावरील गहू व संत्र्याची ३३ झाडे जळाली. आग कशाने लागली अद्याप कोणतेही कारण समोर आले नाही. यामध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. , त्वरित पंचनामा करून शासनाने मदत करावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्याने केली आहे.

सौंदळा येथील पोलिस पाटील यांनी शेताची पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला नुकसान भरपाईची मागणी केली. गेल्या काही दिवसात या भागात आगीचे प्रमाण वाढले आहे. काही ठिकाणी खोडसाळपणा देखील दिसत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे.



## बिर्ला राम मंदिर येथे १९ मार्च पासून संगीत श्री राम कथा

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला:** बिर्ला राम मंदिर येथे १९ मार्च पासून संगीत श्री राम कथा आयोजित करण्यात आली आहे.

निलेश देव मित्र मंडळाच्या पुढाकाराने श्रीराम जन्मापासून राम राज्यापर्यंत डॉ.भूषण फडके कथा सांगतील. त्यांना सौ.वैशाली फडके, प्रा.निखील देशमुख, हार्दिक दुबे, सुमंत तऱ्हाळकर आणि देवाशिष फडके साथ करतील.

१९ मार्च ते २३ मार्च सायंकाळी ७ ते ९.३० कथा आहे.



१९ मार्चला बालकांड आणि वारकरी संत परंपरा, २० मार्चला अयोध्याकांड आणि रामदासी परंपरा, २१ मार्चला अरण्यकांड व किष्किंधाकांड आणि दत्त परंपरा, २२ रोजी सुंदरकांड, युद्धकांड पूर्वार्ध आणि श्री संत गजानन महाराज, २३ रोजी युद्धकांड उत्तरार्ध उत्तरकांड आणि समारोप

२४ मार्चला रामायण नृत्यनाटिका सादर होईल. नृत्यदिग्दर्शक सौ.सई सुयोग रानडे ह्या आहेत. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेवक निलेश देव आणि सहका-यांनी केले आहे.

## माजी आमदार स्व.रामाभाऊ कराळे यांच्या १० व्या स्मृतिदिनानिमित्त सर्वपक्षीय अभिवादन

### सर्व पक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोट:** अकोट विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार दिवंगत स्व.रामाभाऊ कराळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवार १२ मार्च रोजी संत श्री.गजानन महाराज मंदिर परिसर,गजानन नगर,अकोट येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता कार्यक्रमाला अकोट शहरातील विविध राजकीय पक्षांचे नेते,पदाधिकारी, कार्यकर्ते,मित्र परिवार तसेच शहरातील बहुसंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित लावली,कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्व.रामाभाऊ कराळे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी स्व.कराळे यांच्या कार्याचा व व्यक्तिमत्त्वाचा गौरव करत त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याला उजाळा दिला.यावेळी वक्त्यांनी आपल्या



मनोगतातून स्व.रामाभाऊ कराळे यांनीकार्यकर्ता,शिवसेना जिल्हाप्रमुख ते आमदार म्हणून कार्य करताना अकोट विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कामांची आठवण करून दिली.

जनतेशी असलेला त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध,साधेपणा, कार्यकर्त्यांप्रती असलेली आपुलकी आणि समाजहितासाठी केलेले अथक प्रयत्न यांचा विशेष उल्लेख याप्रसंगी करण्यात आला.रामाभाऊंच्या कार्यकाळात अकोट विधानसभा मतदारसंघातील अनेक विकासकामे मार्गी लागली असून त्यांच्या कार्यातून अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली असल्याचे अनेक वक्त्यांनी प्रतिपादन केले. तसेच दिवंगत स्व.रामाभाऊ कराळे यांच्यासोबत दीर्घकाळ काम केलेल्या सहकाऱ्यांनी यावेळी आपले अनुभव व्यक्त करत त्यांच्या संघटन कौशल्याबाबत आणि कार्यपद्धतीबाबत विशेष प्रकाश टाकला.अत्यंत कठीण आणि गरिबीच्या काळात सोबत असलेल्या शिवसेना कार्यकर्त्यांना एकत्रित ठेवण्याची क्षमता,संघटन बळकट करण्यासाठी त्यांनी केलेले त्याकाळी प्रयत्न आणि प्रत्येक कार्यकर्त्याशी जपलेला स्नेह यामुळे ते सर्वांच्या मनात कायम स्मरणात राहतील,असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या अभिवादन कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थितांनी स्व.रामाभाऊ कराळे यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.कार्यक्रमात विविध मान्यवरांनी दोन शब्द मनोगत व्यक्त करत त्यांच्या कार्य व स्मृतींना शब्दरूपी उजाळा देत अभिवादन अर्पण केले. सदर कार्यक्रमात उपस्थित असणारे सर्वपक्षीय नेते,पदाधिकारी,सहकारी तसेच नागरीक कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार संजय गावंडे,नगराध्यक्षा मायाताई धुळे,उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे, राजेंद्र नागमते,पुरुषोत्तम चौखंडे,दिलीप बोचे,कुलदीप वसू ,डॉ.गजानन महल्ले,राजू भालतीलक,राजू रावनकार,गोपाल मोहोड,हरीश टावरी,मनोज चंदन,विजू ढेपे, विजय चंदन,राजू ढोले,शिवा टेंबझरे, विवेक धुळे,बजरंग मिसळे, अनिकेत पोतले, धीरज गीते, प्रसन्न जवंजाळ, राहुल कराळे, मनीष कराळे, श्रीजित कराळे,विजय बेदरकर, कार्यक्रम अत्यंत शांत आणि भावनिक वातावरणात पार पडला.

उपस्थितांनी दिवंगत स्व.रामाभाऊ कराळे यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजकार्यात सक्रिय राहण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला. या प्रसंगी अकोट शहरातील सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र परिवार तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मलकापूरमध्ये उद्या विराट हिंदू सम्मेलन

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सकल हिंदू समाज, मलकापूर वस्ती, अकोलाच्या वतीने ङ्कविराट हिंदू सम्मेलनाचे आयोजन शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता कला महाविद्यालय मैदान, न्यू एच. बी. व्ही. कॉलनी, मलकापूर, अकोला येथे करण्यात आले आहे.

हिंदू धर्माची सांस्कृतिक व धार्मिक एकता अधिक दृढ व्हावी, वसुधैव कुटुंबकम् या उदात्त ध्येयाने समाज एकत्र यावा, कुटुंबव्यवस्था सबळ व्हावी तसेच संघटित शक्ती वृद्धिंगत व्हावी, या पवित्र हेतूने या सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमामध्ये प्रेरणादायी मार्गदर्शन, प्रभावी विचारमंथन तसेच सांस्कृतिक सादरीकरणांचा समावेश राहणार आहे.

या सम्मेलनात प्रमुख वक्ते म्हणून शिवव्याख्याते व दुर्गभ्रमणकार मा. डॉ. शिववल्लभजी शेठे सोलापूर, व्याख्याते मा. प्रा. श्री. विवेकजी बिडवाई गोसेवा प्रमुख, विदर्भ प्रांत तसेच मराठी अभिनेत्री , जिजाऊ फेम सौ. गौरीताई थोरात, यवतमाळ यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार आहे. सर्व हिंदू नागरिक, माता-भगिनी व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन सकल हिंदू समाज मलकापूर वस्ती, अकोलाच्या वतीने करण्यात आले आहे.

**मुख्याधिकारी नगर परिषद, खामगाव**

निविदा / दरपत्रक सुचना

नगर परिषदेला नगर परिषद अंतर्गत ट्रॉफिक सिगनल च्या ठिकाणी सी सी टी व्ही यंत्रणा बसविणे आहे. नगर परिषदेच्या आवश्यकते प्रमाणे सर्व साहीत्यासह तसेच स्थापीत (Installed) करुन पाहीजे. त्या करीता अस्थापना नोंदणीपत्र, GST देय, आयकर देय नोंदणी अस्थापना किंवा कंत्राटदार कडून दोन लिफाफा पध्दतीत दरपत्रके मागविण्यात येत आहे. कोरे निविदा फॉर्म / दरपत्रक दिनांक २०-०३-२०२६ दुपारी ५.४५ वाजे पर्यत भांडार विभागात मिळतील. अनामत रक्कम रु ५०००/- नगदीने ने स्विकारण्यात येतील. निविदा फार्म शुक्ल रु ५००/- नगदीने स्वीकारण्यात येतील. सिलबंद दरपत्रक दिनांक २३-०३-२०२६ रोजी दुपारी ५.४५ वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील, शक्यतो दरपत्रके मुख्याधिकारी यांचे कक्षात उपस्थित पुरवठादार, प्रतिनिधी व त्रिसदस्य समिती समक्ष दिनांक २४-०३-२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येईत. प्राप्त दरपत्रका पैकी एक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे. परिमाणात आवश्यत्ते नुसार कमी अथवा जास्त बदल होवू शकेल. या व इतर अधिक माहिती शर्ती अटी कार्यालयीन वेळेत भांडार विभागात पहावयास मिळतील.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद खामगाव**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आता गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी तालुका स्तरावर पथक

## यवतमाळ जिल्ह्यात घरगुती गॅसचा मुबलक साठा

प्रतिनिधी १३ मार्च

**यवतमाळ** : जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून वितरण प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिली.

गॅस पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये कोणतीही भीती किंवा संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा प्रशासनाने गॅस एजन्सी प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन साठा आणि वितरण व्यवस्थेचा आढावा घेतला.

यावेळी नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनावश्यक साठेबाजी टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

अलीकडील काही दिवसांत गॅस सिलिंडरच्या उपलब्धतेबाबत काही ठिकाणी अफवा पसरत असल्याने नागरिकांमध्ये चिंता निर्माण होत होती.

### नियमित मागणीनुसार पुरवठा सुरू राहणार

■ जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून जाऊन अनावश्यक साठा करण्याची गरज नसून नियमित मागणीनुसार गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी संयम बाळगावा आणि नियमानुसार गॅस घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सर्व गॅस एजन्सींशी समन्वय साधून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत जिल्ह्यात घरगुती गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले. पुढील काळातही साठ्यात कोणतीही कमतरता निर्माण होणार नसल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

सध्या नागरिकांना घरगुती गॅसचा पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्याअंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात व्यावसायिक गॅसचा पुरवठा बंद करण्यात आला असून उपलब्ध साठा प्रामुख्याने घरगुती वापरासाठी राखून ठेवण्यात आला आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील सर्व कुटुंबांना नियमितपणे गॅस सिलिंडर उपलब्ध होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

काही ठिकाणी अनावश्यक भीतीमुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर गॅस सिलिंडरचा साठा करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या साठेबाजीमुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. काळाबाजार रोखण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात विशेष पथके नियुक्त करण्यात आली असून ती नियमितपणे तपासणी करणार आहे.

### कारवाई करण्याचा इशारा

■ जर कोणी गॅस सिलिंडरचा काळाबाजार किंवा साठेबाजी करताना आढळल्यास त्यांच्यावर आवश्यक वस्तू कायद्यांतर्गत (Essential Commodities Act) कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिला. गॅस एजन्सींनाही पारदर्शक आणि नियोजित पद्धतीने वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# लातुरचे जल अभ्यासक प्रा.भोसले उलगडणार पाण्याचे पंचतत्व व विषामृत

प्रतिनिधी १३ मार्च

**यवतमाळ** : शरीर आणि पृथ्वीचा बहुतांश भाग हा पाण्याने व्यापला असुन तिसरे महायुद्ध हे पाण्यासाठीच होणार असल्याचे भाकीत आहे. पाण्यावाचुन जीवसृष्टीची कल्पनाच अशक्य असुन जल ही जीवन म्हणजेच पाण्यालाच अमृत संबोधले आहे. यामुळेच या जीवनदायी पाण्याचे रहस्य व महात्म्य जाणुन घेण्यासाठी पर्यावरण स्नेही मंडळी तर्फे पाण्याचे पंचतत्व व विषामृत या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.

शनिवारी १४ मार्च २०२६ ला सायंकाळी ४ वाजता आर्णी रोडवरील मानवता मंदिर येथे हे मार्गदर्शन सत्र होणार आहे.

लातुरचे जल अभ्यासक प्रा. सुनील भोसले हे सोप्या भाषेत अभ्यासपुर्ण विवेचन करणार असुन पाणी विषयाचे सहज आकलन करणार आहेत.

उप नगराध्यक्ष दत्ताभाऊ कुळकर्णी यांचेहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असुन अध्यक्षस्थानी श्री गुरुदेव सेवा मंडळाचे डॉ. अशोकराव पुनसे असणार आहेत.

प्रत्येक सजीवाच्या जगण्याचा आधार असलेल्या पाण्यातील पंचतत्व आणि विषामृत समजुन घेण्यासाठी सर्व वयोगटातील जागृत यवतमाळकर नागरिक आणि पालकांनी अवश्य उपस्थित राहुन आरोग्यदृष्ट्या पाणी समजुन घ्यावे असे आवाहन आयोजक पर्यावरण स्नेहींनी केले आहे.

# ३२ हजार मुलींना मिळणार कर्करोगापासून संरक्षण

प्रतिनिधी १३ मार्च



**यवतमाळ** : गर्भाशयमुख कर्करोगापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'एचपीव्ही' (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ यवतमाळ तालुक्यातील हिवरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते करण्यात आला. जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुरू झालेल्या या महत्त्वपूर्ण आरोग्य उपक्रमामुळे जिल्ह्यातील १४ ते १५ वयोगटातील मुलींना गर्भाशयमुख कर्करोगाविरोधात संरक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राज्यस्तरावर या मोहिमेचा प्रारंभ ८ मार्च रोजी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर जिल्ह्यातील मोहिमेला हिवरी येथून सुरुवात झाली. या कार्यक्रमाला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. क्रांतिकुमार नावंदीकर, सरपंच रंजना भगत, उपसरपंच अभिजीत मुरके, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण नैताम, डॉ. श्रद्धा पुजारी तसेच आरोग्य विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या मोहिमेअंतर्गत १४ वर्षे पूर्ण झालेल्या पण १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे. पुढील तीन महिन्यांत जिल्ह्यातील सुमारे ३२ हजार मुलींना लसीकरण करून त्यांना गर्भाशयमुख कर्करोगाच्या धोक्यापासून सुरक्षित करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील एकही मुलगी लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले आहे. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र स्तरावर हे लसीकरण मोफत करण्यात येणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी उपस्थितांना संबोधित करताना महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या आरोग्याशी थेट जोडलेले असल्याचे सांगितले. एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित असून पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. पोलिओ लसीकरणाबाबत सुरुवातीला अनेक शंका व्यक्त केल्या जात होत्या; मात्र सर्वांनी लस घेतल्यामुळे आज पोलिओसारखा गंभीर आजार नियंत्रणात आला आहे, त्याचप्रमाणे एचपीव्ही लसीकरणामुळे भविष्यात गर्भाशयमुख कर्करोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी सांगितले की, आशा स्वयंसेविका, आरोग्य सेविका आणि शिक्षकांच्या माध्यमातून शाळा तसेच गावपातळीवर जनजागृती केली जात आहे. लसीकरण मोहिमेसाठी सर्व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून जिल्ह्यात लसीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील मुलींना समानपणे लाभ मिळेल याची दक्षता घेतली जाणार आहे.

कार्यक्रमात प्रतीकात्मक स्वरूपात राधा कुमरे आणि राखी कुमरे या मुलींना लस देऊन जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कर्करोगमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगत जिल्हा प्रशासनाने सर्व पालकांनी आपल्या मुलींचे वेळेत लसीकरण करून या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# हिरापुर घाटात अवैध रेती उत्खनन, पाच वाहनांची जप्ती

प्रतिनिधी १३ मार्च



**झरी** : यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन मंडळात सध्या एक महत्त्वाची कारवाई करण्यात आली आहे. 12 मार्च 2026 रोजी रात्री अवैधरीत्या रेती उत्खनन आणि वाहतूक करणारे पाच वाहन पकडले गेले, ज्यामुळे एक मोठा धक्का अवैध रेती उत्खननाच्या धंद्याला बसला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील हिरापुर घाटावर ही कारवाई करण्यात आली, ज्याला पैनगंगा नदीचे किनारे आहेत. या घाटाची देखरेख यवतमाळ येथील बिलाल ट्रेडर्स व प्रोपराईटर सैय्यद मन्सुर सैय्यद दाउद यांच्याकडे करण्यात येते.

मुकुटबन मंडळ अधिकारी सुभाष शंकरराव खैरे यांच्या नेतृत्वाखाली या कारवाईचे नियोजन करण्यात आले. त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी पांढरकवडा, तहसिलदार अक्षय रासने, स्थानिक गुन्हे शाखा PSI धनराज हाके आणि पोलीस अंमलदार सफौ/1356 नईम शेख यांची मदत घेतली. त्यानंतर मंडळ अधिकारी सुभाष खैरे यांच्या नेतृत्वाखाली, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पंचनामा करणारे अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारीही घाटावर गेले. त्यावेळी त्यांनी पोकल्यांड (LG1922E2HSN904061) वाहन, JCB (MH29 BV 4615), ट्रक MH29 BE 8558 आणि ट्रक MH29 BE 4140 अशा चार वाहनोंसह इतर मुद्देमाल जप्त केला.

गोपनीय माहिती मिळाल्यानंतर, 12 मार्च 2026 रोजी रात्री 2 वाजता या कारवाईचा पाठलाग सुरू करण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यातील पंचनामे केले जात असताना, अवैधपणे रेती उत्खनन करणारे वाहने पळून गेले, तथापि, पोलीस प्रशासनाने त्यांचा पाठलाग केला, परंतु आरोपी घटनास्थळावरून फरार होण्यास यशस्वी झाले.

त्यानंतर, तहसिलदार अक्षय रासने यांच्या नेतृत्वाखाली सविस्तर पंचनामा केला गेला. जप्त करण्यात आलेल्या वाहनोंची एकूण किंमत 1,08,24,600 (एक करोड आठ लाख चोविस हजार सहाशे रुपये) आहे. यामध्ये पोकल्यांड वाहनाची किंमत 50 लाख, JCB वाहनाची 30 लाख, ट्रक वाहनांची 28 लाख आणि 140 लिटर डिझेलची किंमत 12,600 समाविष्ट आहे.

अवैध रेती उत्खनन आणि वाहतूक केल्याप्रकरणी संबंधित वाहनधारकांच्या विरुद्ध भारतीय दंड संहिता तसेच महाराष्ट्र जमीन महसुल कायद्याच्या कलम 48(7) व 48(8) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या कारवाईनंतर सैय्यद मन्सुर सैय्यद दाउद आणि सैय्यद कादर सैय्यद दाउद यांच्यावर देखील कारवाई करण्यात येणार आहे, कारण हे दोघेही घाटाची देखरेख करत होते.

तक्रारदार सुभाष खैरे यांनी पोलीस स्टेशन मुकुटबनमध्ये लेखी तक्रार केली आहे, ज्यावर पोलीस अधिकाऱ्यांनी कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. सदर कारवाईत जप्त केलेल्या मुद्देमालाचे मूल्य खूपच मोठे असल्यामुळे यवतमाळ जिल्ह्यात अवैध रेती उत्खननाला कंठाळा आणण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

# मराठी शाळा वाचविण्यासाठी पालक-विद्यार्थ्यांचा एल्गार मोर्चा

प्रतिनिधी १३ मार्च

**यवतमाळ** : राज्य सरकारच्या शालेय शिक्षण धोरणाविरोधात ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन (ए.आय.एस.एफ.) ने 17 मार्च 2026 रोजी एक महत्त्वाचा एल्गार मोर्चा आयोजित केला आहे. यवतमाळ येथून हा मोर्चा सुरू होईल आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर जाऊन शासनाच्या शिक्षण धोरणाविरोधात निवेदन सादर करेल. यामध्ये लाखो पालक आणि विद्यार्थी सहभागी होऊन राज्यातील शालेय शिक्षणावर होणाऱ्या संकटाच्या विरोधात आपला आवाज उठवणार आहेत.

राज्य सरकारच्या नवा निर्णयामुळे कमी पटसंख्येच्या कारणावरून हजारो मराठी शाळा बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यवतमाळ येथील शालेय विद्यार्थ्यांवर या निर्णयाचा गडद परिणाम होईल, म्हणून ए.आय.एस.एफ.ने या निर्णयाला विरोध करत मोर्चा आयोजित केला आहे. मोर्चात शालेय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या मागण्यांचे निराकरण करण्यासाठी एकत्र येणार आहेत.

शालेय शिक्षणावर राज्य सरकारच्या या धोरणाचा विपरीत परिणाम होईल आणि शालेय पोषण आहार, शिक्षणाच्या गुणवत्तेवर नकारात्मक प्रभाव पडेल, याची माहिती देणारे निवेदन मोर्चात सादर केले जाईल. यवतमाळमधील ए.आय. एस.एफ. पदाधिकारी, कॉ. अथर्व निवडिंग, अयान शाह, अभिजित नगराळे, रोशनी कांबळे, पियुष सोनुले आणि इतर नेत्यांनी या मोर्चासाठी जास्तीत जास्त सहभागाची अपील केली आहे.

संबंधित निवेदनात राज्य सरकारकडून कमी पटसंख्येच्या शाळांवर तातडीने निर्णय घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दत्तक शाळा योजनेंतर्गत शाळांचे खाजगीकरण थांबविण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी या निर्णयांचा प्रभाव कमी करण्यासाठी शालेय शिक्षणाचे संरक्षण करण्याचे आवश्यक असल्याचे मोर्चा आयोजकांनी सांगितले आहे.

# चंदन छल्लाणी घेणार जैन भगवती दीक्षा

प्रतिनिधी १३ मार्च

**आर्णी** : शहरातील व्यावसायिक अशोकचंद छल्लाणी यांची कन्या चंदन छल्लाणी हिने संसारिक जीवनाचा त्याग करून जैन भगवती दीक्षा घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. तिच्या या आध्यात्मिक निर्णयामुळे आर्णी शहरासह संपूर्ण तालुक्यात समाधान आणि गौरवाचे वातावरण निर्माण झाले आहे.



चंदन छल्लाणी हिच्या मंगल प्रवेशानिमित्त रविवारी (१५ मार्च) सकाळी शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. सकाळी साडेआठ वाजता विठ्ठल देशमुख यांच्या वीज वितरण कार्यालयापासून शोभायात्रेला प्रारंभ होऊन ती अशोकचंद छल्लाणी यांच्या निवासस्थानापर्यंत पोहोचणार आहे.

आर्णी शहराला सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्याचा समृद्ध वारसा लाभला आहे. शहरातील नागरिकांकडून वृद्धाश्रम, निराधार आणि गरजूंसाठी सातत्याने मदत केली जाते. अशा पार्श्वभूमीवर छल्लाणी कुटुंबाने धार्मिक क्षेत्रात दिलेले हे योगदान विशेष मानले जात आहे.

वैराग्यमूर्ती चंदन छल्लाणी हिने सांसारिक सुखाचा त्याग करून अध्यात्माचा कठीण मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला असून, तो आर्णीकरांसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या ऐतिहासिक आणि विशेष सोहळ्यात आर्णीकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन छल्लाणी परिवाराकडून करण्यात आले आहे.

# 'सेल्फीसाठी नव्हे तर सेल्फसाठी जगा': राजश्री पाटील

प्रतिनिधी १३ मार्च

**उमरखेड** : सुंदर आयुष्य जगायचे असेल तर ते सुंदरपणे जगावे. आपल्या जगण्याचे कारण शोधून स्वतःचे आत्मपरीक्षण करावे. सेल्फीसाठी नव्हे तर सेल्फसाठी जगा आणि आपल्या सभोवतालचे जगही सुंदर करण्याचा प्रयत्न करा, असे प्रतिपादन राजश्री पाटील यांनी केले.

येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयात महिला विकास कक्ष आणि उमरखेड इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.



कार्यक्रम प्राचार्य डॉ. माधव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

यावेळी गोदावरी समूह, नांदेडच्या विमल राऊत, उमरखेड नगर परिषदेच्या अध्यक्षा तेजश्री जैन, उज्ज्वला वानखेडे, शांता इंगळे, प्रा. डॉ. शीतल सुर्वे तसेच उषा तास्के यांची उपस्थिती होती.

शांता इंगळे यांनी बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सशक्तीकरण कसे घडते यावर विचार मांडले. शिक्षणामुळेच महिलांचे व्यक्तिमत्त्व घडले असून महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांसारख्या समाजसुधारकांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी महिलांना प्रेरणा दिली.

उज्ज्वला वानखेडे आणि नगराध्यक्ष तेजश्री जैन यांनीही महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक सहभाग यांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उषा तास्के यांनी केले. सूत्रसंचालन प्राची चवरे, वैदेही पेरजाबादकर आणि वैष्णवी सूर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. शीतल सुर्वे यांनी केले.

# "दान दिल्याने कमी होत नाही, पुण्यच वाढते" – महंत सावरिया महाराज

प्रतिनिधी १३ मार्च



**आर्णी** : आर्णी येथे ३० मार्च ते ५ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या महाशिवपुराण कथेसाठी मंडप भूमिपूजन सोहळा संत-महंतांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात पार पडला. माहूर रोडवरील श्री बहिरमदेव महाशिवपुराण सेवा समितीच्या वतीने जगप्रसिद्ध शिवकथा वाचक पं. प्रदीपजी मिश्रा (सिहोर वाले) यांच्या मुखातून ही शिवमहापुराण कथा होणार आहे.

या प्रसंगी यवतमाळ येथील बालाजी मंदिर संस्थानचे महंत पूज्य सावरिया बाबा महाराज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "दान दिल्याने कमी होत नाही; उलट त्यातून पुण्याची वृद्धी होते." एवढा मोठा धार्मिक कार्यक्रम निर्विघ्न पार पडण्यासाठी सर्वांनी सढळ हाताने सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. आर्णीकरांचे भाग्य आहे की परमेश्वराने इतक्या मोठ्या पवित्र कार्यासाठी त्यांची निवड केली आहे, असेही त्यांनी नमूद केले.

भूमिपूजन सोहळा संतांच्या पवित्र सान्निध्यात पार पडला. यावेळी महंत सावरिया महाराज (बालाजी मंदिर, यवतमाळ), प.पू. डॉ. धनेश्वर उपाख्य योगी श्याम भारतीजी महाराज (माहूर), श्री महंत डॉ. ज्ञानेश्वर भारतीजी महाराज उपाख्य बाळू महाराज काकाणी (माहूर), महंत जितेंद्र महाराज (पोहरादेवी), संत अंबिका माता (बोपापूर), महंत योगेश पुरी महाराज (जांब), ह.भ.प. गजानन केंद्रे महाराज (आर्णी), प्रियदर्शनजी भारती (आर्णी) तसेच डॉ. सिद्धार्थ भारती (यवतमाळ) यांची प्रमुख उपस्थिती होती.

पोहरादेवीचे महंत जितेंद्र महाराज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कथा-कीर्तनामुळे मनाला सुख आणि शांती मिळते. धनाने सर्व काही विकत घेता येत नाही; आत्मिक समाधानासाठी आध्यात्माची जोड आवश्यक आहे. प्रार्थना आणि धर्मकार्यामुळे व्यक्ती व पुढील पिढ्यांनाही सुख-शांती लाभते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना गोपाल कोठारी यांनी शिवमहापुराण कथेचे स्वरूप व आयोजनाचा आढावा मांडला. कथेदरम्यान होणाऱ्या अन्नदान व सेवाकार्यासाठी भक्तांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. आज सकाळी पाच युगल दाम्पत्यांच्या हस्ते होमहवन व अभिषेक करून संतांच्या उपस्थितीत मंडपाचे भूमिपूजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शिवमहापुराण आयोजन सहकार्य समितीचे दिलीप चिंतावर, पवन पणपालिया, शंकर मारबते, संतोष जयस्वाल, दर्शन कोषटवार, विनायक थोडगे, गोपाल कोठारी, नरसिंग जाधव, रवि नालमवार, रंजीत राठोड, मुन्ना यादव, भिकू पटेल, पुरुषोत्तम इंगोले, राजेश आडे, गोपाल शर्मा, निलेश गावंडे, राजेश माहेश्वरी, सुनील चोरडिया, राजेंद्र नालमवार, सचिन दिप्पेवार आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन राजेश माहेश्वरी यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला व पुरुष भक्त उपस्थित होते. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शिवरामजी मोघे महाविद्यालय पांढरकवडा येथे 'नॅशनल सायन्स डे' निमित्त क्विझ स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी १३ मार्च

**पांढरकवडा** : शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने नॅशनल सायन्स डे निमित्त क्विझ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ अजय सोळंके यांचे मार्गदर्शन लाभले स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सुजाता शेंडे वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख यांनी प्रास्ताविक पर भाषण करून राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व, विज्ञानाचा समाजाच्या प्रगतीतील वाटा आणि विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याची आवश्यकता यावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी सहाय्यक प्रा विजय वातीले वनस्पती शास्त्र विभाग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व तसेच विज्ञान क्षेत्रातील प्रगती या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. विज्ञानामुळे मानव जातीच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलां वर ही त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. पी. जी. ढवळे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

या क्विझ स्पर्धेला एकूण ६८ विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विज्ञानविषयक प्रश्नांची उत्तरे देत आपले ज्ञान प्रदर्शित केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. १३ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्ह्यात इंधन पुरवठा सुरळीत, अफवांवर विश्वास ठेऊ नये -प्र जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील

**वाशीम :** मध्यपूर्व आशिया, अमेरिका आणि युरोपमध्ये सध्या सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा भासणार नाही. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत राहील, याबाबत जिल्हा प्रशासन सतर्क आहे.अशी माहिती प्र जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी दिली आहे. भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि इंडियन ऑईल या तिन्ही प्रमुख कंपन्यांकडे पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. जिल्हा प्रशासन आणि तेल कंपन्या जिल्ह्यात इंधनाचा साठा कायम राखण्यासाठी समन्वयाने काम करीत आहे. त्यामुळे इंधनाचा तुटवडा होणार असल्याच्या अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये. तसेच, पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर युद्धाची परिस्थिती असली तरी, खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने इंधन पुरवठ्याचा आढावा घेतला असून परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.




# शिक्षण अधिकाऱ्याने मागितली ५० हजाराची लाच...

# द्या दाम तरच काम, भ्रष्टाचारी त्यांचं नाम !

* माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांनी शिक्षकाला शिफारस पत्र देण्यासाठी मागितली ५० हजाराची लाच
* वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराचे ग्रहण
* भ्रष्ट अधिकाऱ्यांना डीवायडी, परीक्षा मंडळाचे अध्यक्ष यांची साथ
* अमरावती, पुणे, मुंबईतील वरिष्ठांनाही दरमहा मिळतो 'मलिदा' ?
* भ्रष्ट शिक्षणाधिकाऱ्यांना नागपूरच्या मंत्र्याचा 'राजाश्रय'
* विभागीय शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी दखल घेवून भ्रष्ट शिक्षणाधिकाऱ्यास दिला 'दम'

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभाग मागील अनेक वर्षापासून भ्रष्टाचाराने राज्यात अव्वल स्थानावर आहे. त्यामध्ये विद्यमान माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांनी रूजू झाल्यापासून कोणत्याही कामासाठी पैसा खाण्याचा सपाटा सुरू केल्याने शिक्षण क्षेत्रात 'खाऊगिरी 'चा डंका वाजत आहे. नुकतेच एका शिक्षकाला शिफारस पत्र देण्यासाठी पैशाची चटक लागलेल्या माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांनी चक्क ५० हजाराच्या लाचेची मागणी केल्याचा व्हीडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. या गंभीर आणि धक्कादायक प्रकाराची दखल अमरावती विभागाच्या शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे (बोंडे) यांनी घेवून भ्रष्ट शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांना धारेवर धरून चांगलाच 'दम' भरल्याची शिक्षण विभागात खमंग चर्चा आहे.

वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभाग बोगस भरतीने राज्यात बदनाम झालेला आहे. मागील १५ वर्षात काही शिक्षणाधिकाऱ्यांचा अपवाद वगळता प्रभारी व स्वत:ला कर्ते धर्ते समजणाऱ्या कथित उपशिक्षणाधिकाऱ्यांनी सुद्धा वाशीममध्ये 'कोट्यवधी'ची उलाढाल केल्याचे सर्वश्रुत आहे. त्यामध्ये विद्यमान माध्यमिक शिक्षणाधाकारी मंगला धुपे यांनी 'भर' टाकल्यामुळे कोणत्याही कामासाठी 'त्यांनी' खुलेआम मागितलेली लाच दिल्याशिवाय त्या स्वाक्षरीच करत नसल्याची गंभीर बाब एका व्हीडीओने उघडकीस आली आहे. वाशीम जिल्ह्यातील एका शिक्षकाने त्यांना

शिक्षणाधिकाऱ्यांची शिफारस पाहीजे असल्याने त्या शिक्षकाने चार-साडेचार महिन्यापुर्वी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात फाईल दाखल केली. परंतु त्यांना शिफारस पत्र देण्यासाठी टाळाटाळ केल्या जात असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली. त्या शिक्षकाने शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांची भेट






घेवुन शिफारस मागितली तेव्हा त्या शिक्षकास चक्क ५० हजाराची मागणी करण्यात आली. या गंभीरबाबीची तक्रार त्या त्रस्त शिक्षकाने अमरावती विभागाच्या शिक्षकनेत्या डॉ. संगीता शिंदे (बोंडे) यांचेकडे केली. भ्रष्ट माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या अनेक सुरसकथा त्यांच्या समोर त्रस्त शिक्षकांनी सांगितल्या. या कथा ऐकून शिक्षकनेत्याही आवाक झाल्यात. नंतर त्यांनी भ्रष्ट माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांना फोन करून त्यांची कानउघाडणी करून चांगला दम दिल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. डॉ. संगीता शिंदे यांनी फक्त दमच नाही दिला, यापुढे एसीबीची कारवाई सुद्धा करू तसेच शिक्षणमंत्र्यांकडेपण तक्रार करणार असल्याची 'तंबी' सुद्धा भ्रष्ट शिक्षणाधिकाऱ्यास दिल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे.

**शिक्षक नेत्या डॉ. सौ. संगीता शिंदे (बोंडे) यांनी त्यांच्या फेसबुकवर शिक्षणाधिकाऱ्यांनी ५० हजाराची लाच मांगितल्याचा व्हिडीओ व्हायरल केला व शिक्षणाधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावरून शिक्षण विभागात दाम दिल्याशिवाय काम होत नसल्याचे सिध्द झाले आहे.**

## भरती घोटाळ्याचा २०१४ पासून सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...

### दोन शिक्षण अधिकारी निलंबीत, अनेक शाळांवर गुन्हे दाखल

वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४ मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती. तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती, पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले. नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग, आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे, तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे. या प्रकरणी सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. काही शाळांनी तर खोटे वृत्त छापल्यामुळे सिटी न्युज सुपरफास्टवरच गुन्हे दाखल केले आहेत.

## थोडक्यात

### जागतिक महिला दिन



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मंगरूळपीर राजस्थानी महिला मंडळ व राजस्थानी वरिष्ठ मंडळ यांनी संयुक्तरित्या स्थानिक देवकी भवन येथे विविध कार्यक्रमा चे आयोजन केले. महिला कमजोर नाही ह्या विषया वर एक नाटिका प्रस्तुत करण्यात आली ह्या मध्ये वीणा सोमाणी, लता बजाज, नम्रता बंग, कल्पना जाखोटिया, उषा काबरा, लता बंग, बबिता जाखोटिया ह्यांनी केले तसेच राणी लक्ष्मीबाई, जिजाबाई सावित्रीबाई फुले, सुषमा स्वराज, लता मंगेशकर डॉक्टर, सुष्मिता सेन, इंदिरा गांधी, मीराबाई जोधाबाई हया सर्व मान्यरांची भूमिका श्रुति मेहता, शारदा भूतड़ा, अमृता बाहेती, ज्योति भूतड़ा, माधुरी राठी, सावित्री जाखोटियां, गीता राठी, व असंख्य महिला उपस्थित होत्या.

## महिला व बालकांच्या समुपदेशन केंद्रामध्ये जागतिक महिला दिन उत्साहात

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

स्थानिक जुनी पंचायत समिती येथे महिला व बालकांच्या समुपदेशन केंद्रामध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्रांतीज्योती बाई फुले आणि मा जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापिका शिवरत्न महिला मंडळ प्रमुख पाहुणे साहेबराव भगत माजी जिल्हा परिषद सदस्य बजरंग पेंढारकर सामाजिक कार्यकर्ता, कविता भगत उमेद जिल्हाध्यक्ष ऋषी बचत गट, मनीषा दाभाडे विधी सल्लागार, शुभांगी सोळंके, वर्षा प्रधान, अर्चना खडसे वनिता मोरडे, सुर्वे ताई, सीमा पेंढारकर, साधनाताई, जयश्री पवार, मंदा टंचर, यमुना बेलखेडे, शुभांगी पेंढारकर, कविता काळे, वंदना नाकाडे, शुभांगी करपे, रेखाटेटवार, ताई बाई मनवर, कावेरी कुलकर्णी, श्रद्धा रघुवंशी, कोमल टेटवार यांची उपस्थिती लाभली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा दाभाडे आभार सोनल पेंढारकर यांनी मानले कार्यक्रमाचे आयोजन शिवरत्न महिला मंडळ अध्यक्ष वनमाला पेंढारकर यांनी यांनी केले कार्यक्रमाला महिलांची बहुसंख्येने उपस्थित लाभली.



## मालेगाव नगरपंचायत मध्ये शंभर कोटीचा अपहार !

*प्रशासन काळातील गैरप्रकार * प्रशासकांनी चालविली हुकूमशाही * मनरेगाच्या पार्श्वभूमीवर कारवाईची गरज

●संतोष आढाव @ मालेगाव●

शहर असो की, गाव खेडे जनसामान्यांच्या विकासाकरिता आपल्या देशाच्या आदर्श संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्था उभारलेल्या आहेत. मात्र शासन कर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे अधिकारी व पदाधिकारी सदर स्थानिक स्वराज्य संस्था लुटून खात असल्याचे समजते. मालेगाव नगरपंचायतच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तर तब्बल शंभर कोटी रुपयांचा अपहार केला असल्याचे समजते.

मालेगाव ची ग्रामपंचायत संपुष्टात येऊन नगरपंचायत अस्तित्वात आली. त्यानंतर नगरपंचायत चा पंचवार्षिक कार्यकाळ संपताच सर्वत्रिक निवडणुका पुढे ढकलून शासन स्तरावरून प्रशासकीय अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती




करण्यात आली. परंतु प्रशासकांनी शहराचा विकास खड्डयात टाकून वाटेल तेथे रस्ते त्याचप्रमाणे विविध कामे करून शासनाची अक्षरशः दिशाभूल केली सदरबाब ही सर्वसामान्य जनता उघड्या डोळ्याने पाहत असताना मात्र या मनमानी कारभाराची फिर्याद मांडावी कोणाकडे असा प्रश्न उपस्थित झाला होता. हे प्रशासक महोदय एवढे निगरगठ्ठ होती की, माननीय न्यायालयाने दिलेल्या आदेशाला सुद्धा जुमानले नाही. कुठल्याही कामाला दाम मोजल्याशिवाय कुठलेही काम होत नव्हते. म्हणजेच हम करू सु कायदा अशी भूमिका प्रशासकाची होती. प्रशासक केवळ एखाद्या उद्योगपती सारखे नगरपंचायत मध्ये येऊन केवळ फेरफटका मारण्याचे काम तसेच दिलेल्या 'महत्त्वाच्या कागदावरच' सह्या करून आपले कर्तव्य बजावत होते. प्रशासकांनी एवढी मनमानी चालविली की, शासकीय विश्रामगृह लगत सिमेंट रस्ता बनवून आपल्या अकलेचे तारे तोडून प्रदर्शनात मांडल्यासारखे केले.




विशेष म्हणजे विश्रामगृहाला लागून जो रस्ता बनविण्यात आला तो परिसर निर्मनुष्य वस्तीतील असल्यामुळे सदरचा रस्ता हा केवळ लोकांना प्रातविधी करण्याच्या कामी येत आहे. तर दुसरीकडे दोनशे मीटरच्या अंतरावर सेलू फाटा परिसर म्हणजेच संताजी नगर मध्ये पावसाळ्यामध्ये रस्त्याने चालणे कठीण होते एवढा चिखलमय रस्ता आहे.

# रिठद येथील नागरिकांचा अवैध धंद्याविरोधात सूर...

# पोलीस चतूर, कारवाई थातूर - मातूर !

### *पो. स्टे. वाशीम ग्रामीण हद्दीतील प्रकार, कारवाई न करण्याचा करार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील रिठद येथे दोन दिवसाआधी अवैध धंद्यांवर पोलिसांनी दोन कारवाया केल्यात. एका ठिकाणी वरली मटक्यावर कारवाई करण्यात आली तर दुसरीकडे अवैध दारू विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई करण्यात आली. परंतु रिठद येथे सुरू असलेल्या मुख्य क्लब आणि इतर काही अवैध व्यवसाय करणाऱ्यांना पोलिसांनी आधीच कारवाईची माहिती दिल्याचे सांगितले जात आहे. त्यामूळे या दोन्ही कारवाया केवळ थातुरमातुर आणि बोगस असल्याचं आरोप स्थानिकांकडुन केला जात आहे. तसेच ग्रामीण हद्दीत सुरू असलेल्या अवैध व्यवसायाला काही वसुली बहाद्दर पोलीस कर्मचाऱ्यांनी परवानगी दिली असून अशा पोलीस कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी होत आहे.

रिठद येथील वरली मटक्यावर वाशीम ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत वरली मटक्याचे चिठ्ठ्या आणि जुगार साहित्य असा एकूण आठशे सत्तर रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केले. तसेच आरोपी महादेव सयाजी धबडघाव रा. रिठद याच्या विरुद्ध ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आलं आहे. असो, मात्र प्रत्यक्षात या कारवाई मागची कहाणी काही वेगळीच असल्याची चर्चा गावात ऐकू येत आहे. ती






चर्चा नेमकी काय सुरू आहे. पुढे जाणून घेऊ या. रिठद येथे अवैध दारू आणि जुगार, क्लब सारखे अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून ते सुरू ठेवण्यासाठी ग्रामीण पोलिसांना दरमहा हप्ते ठरविण्यात आले आहे. दरम्यान याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना मिळाल्याने संबंधित ठाण्यातील पोलिसांना कारवाई करण्याचे सूचना देण्यात आले. पण हप्ते घेणाऱ्या पोलिसांनाच जर कारवाई करण्याचे आदेश दिले जातील तर कारवाई कशी करणार असा सवाल हप्तेखोर पोलिसांना पडला होता. त्यामुळे वरिष्ठांना कारवाई केल्याचे दाखविण्यासाठी संबंधित जुगार चालविणाऱ्या व्यक्तीला आधी विनंती करण्यात आली की, तुम्ही सर्व काही बिंधास्त चालवा कोणीच काही करणार नाही. फक्त वरिष्ठांना दाखवण्यासाठी आम्हाला काही तरी कारवाई द्या. त्यानंतर आठशे सत्तर रूपयाची जुगारवर थातुरमातुर बोगस कारवाई ग्रामीण पोलिसांनी केल्याचे आरोप नागरिकांकडून होत आहे. आणि याच बोगस कारवाईचा मोठा गवगवा देखील करण्यात आलं असल्याचा सांगितले जात आहे.

ग्रामीण पोलिसांनी रिठद मध्ये जुगारवर कारवाई केली. म्हणून ११ मार्च रोजी एसडीपीओच्या पथकाने रिठद येथील अवैध व्यवसायावर त्याच प्रकारे कारवाई करण्याचे ठरविले. मात्र कारवाईसाठी निघण्याआधी सर्व अवैध व्यवसायिकांना याच पथकातील एका वसुली बहाद्दरांनी कॉल करून सांगितल्याची चर्चा आहे की, आम्हाला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाईचे आदेश दिले आहे. तुम्ही सर्व धंदे काही वेळ बंद करा. आम्ही येऊ आणि एखादी किरकोळ कारवाई करून निघुन जावू. त्या नंतर काही वेळात रिठद येथे हा पथक पोहचला. तो पर्यंत सर्व मोठे जुगार क्लब आणि इतर अवैध धंदे बंद करण्यात आले होते. मात्र काही तरी कारवाई करावी लागेल. यासाठी या पथकाने पुढची दिशा ठरविली. ज्या ठिकाणाहून हप्ता भेटत नाही. अशा रिठद येथील सरपंच ढाबा या ठिकाणी छापा मारून कारवाई केली. या कारवाईत देशी विदेशी कंपनीची अवैध दारू ज्याची किंमत १० हजार ९० रुपये आणि एक मोबाईल ७ हजार रुपये असा एकूण १७ हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलं. या प्रकरणी संजय तायडे रा. काटा ता. जि. वाशिम. तसेच दिलीप देशमुख रा. डोंगरकिन्ही ता. मालेगांव .जि. वाशीम या दोन्ही आरोपी विरुध्द वाशीम ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आलं आहे.

या कारवाई नंतर रिठद येथील सर्व अवैध धंदे पुन्हा सुरळीत चालू झाल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगितले जात आहे.

**घरचे भेदी दूर करण्याची मागणी**

रिठद येथे पोलिसांनी केलेल्या या दोन कारवाया केवळ थातुरमातुर किंवा 'बोगस' असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. तसेच ग्रामीण हद्दीत सुरू असलेल्या अवैध व्यवसायांना दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे संरक्षण मिळत असल्याचीही माहिती पुढे येत आहे. यामध्ये एक नाव ग्रामीण पोलीस ठाण्यातील कर्मचारी 'राऊत' आणि दुसरं पोलीस कर्मचारी वाशीम एसडीपीओ कार्यालयातील 'राठोड' यांच्या नावांची चर्चा होत आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी या दोन्ही कारवायांची सखोल चौकशी करून वसुली बहाद्दर पोलिसांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या शिवाय पोलीस खात्यातील 'घरचे भेदी' देखील दूर करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेले...

## कुंभी येथे मटका जुगार जोमात !

### पोलिसांनी लक्ष देणे गरजेचे

●सिटी न्युज ब्युरो @ आसेगाव●

कुंभी येथे राजेरोसपणे शामियाना टाकून वरली व जुगार जोमात चालू असून पोलिसांचे मात्र दुर्लक्ष आहे. वरली बहाद्दर म्हणतात संपूर्ण जिल्हा बंद आहे पण नागरिक म्हणतात आम्ही आताच लावून आलो हे आमच्या चिठ्ठया असे सुद्धा चित्र पहावयास मिळत आहे. परिसरातअवैध दारू सुद्धा विक्री चालू असून दारूमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहे.

मागील काही महिन्यां पासून आसे गाव पोलिस स्टेशन च्या आंतगत असलेल्या कुंभी या गावात बिट अंमलदार असून यांच्या आशिर्वादाने व्यवसायाची खुलेआम सट्टापट्टी बनविली जात आहे. यात सट्टा लावणाऱ्याची संख्या मोठी असून अनेकांचे संसार उघड्यावर येत आहे. म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. अवैध दारू विक्री सह आता परिसरात जुगार, मटका व्यवसायाला ही तेजी आल्याचे चित्र दिसून येत आहे. मटका घेणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने वरिष्ठांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी सामान्य नागरिकांतून केल्या जात आहे. वरळी मटका घेणाऱ्यात आता युवक उतरले असून मटका मालक लग्न चा मंडप जसे टाकतात तसा मंडप टाकुन सट्टा बाजार कुंभी बस तांब्याच्या मागे. लावुन पन




पोलीस प्रशासनाची डोळेझाक होत आहे. जेव्हा या सत्याची माहिती पोलिसांना दिल्या जाते ते स्पष्ट उत्तर देतात सध्या आमच्याकडे कुठलाही धंदा चालू नाही असे बोलले जात यावर आळा बसणार नाही, हे सर्वसामान्य नागरिकांना माहिती आहे. मात्र, अवैध व्यवसायावर आळा बसविण्यास असलेली यंत्रणा कमी पडते आहे, की असं बोलल्या जात आहे. कारण यामध्ये अर्थपूर्ण व्यवहार होत असल्याची सुद्धा नागरिकाकडून माहिती मिळत आहे.

**नागरिकांमध्ये रोषाचे वातावरण**

मागील काही महिन्यांपासून आसेगाव पोस्ट अंतर्गत येत असलेल्या कुंभी, शेंदुर्जना , रुई गोस्त सह परिसरातील काही गावांमध्ये गावात अवैध दारू विक्री सुद्धा जोमात चालू आहे. त्यामुळे पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांतून केला जात आहे. खुलेआम चालणाऱ्या या धंद्यावर आळा घालावा, अशी मागणी होत असली तरी या मागणीकडे कानाडोळा होत असल्याचे एकंदरीत चित्र दिसून येते आहे

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## गांधी रोड वरील अनधिकृत बांधकामावर कारवाई

**अकोला :** महानगरपालिका आयुक्त डॉ.सुनील लहाने तसेच मनपा उपायुक्त विजय पारतवार आणि पुर्व झोन कार्यालयाचे सहा.आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात १२ मार्च रोजी गांधी रोड लगत असलेल्या नझूल शीट क्रं. २८-सी, चांद शहावली दरगाह च्या जागेत अ.गणी अ.लतीफ यांचे अनधिकृत बांधकामावर मनपा प्रशासनाव्दारा पोलीस बंदोबस्तात निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत सहा.अतिक्रमण निर्मुलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, सिटी कोतवालीचे पी.एस.आय. ईरफान शेख, कनिष्ठ अभियंता अक्षय बोर्डे, राहूल राऊत यांचा समाावेश होता.

# बिश्नोई गँगपेक्षा अकोटचे पत्रकार रविराज मोरे डेंजर !

प्रतिनिधी १३ मार्च

**मुंबई :** अकोट येथील स्वयंघोषित पत्रकार, संपादक आणि राज्यातील विविध पोलिस स्टेशन मध्ये फसवणुकीचे व ४२० चे गुन्हे दाखल असलेल्या रविराज मोरे यांच्यामुळे जिवाला धोका असल्याचा आरोप सत्तारुढ भाजपचे ज्येष्ठ आमदार प्रकाश भारसाकळे यांनी गुरुवारी विधानसभेत केला आहे. आमदार भारसाकळे यांनी हा पत्रकार सुपारी देऊ शकतो अशी शंका उपस्थित केल्यानंतर अकोला पोलिस, अकोट पोलिस या बोगस पत्रकाराच्या विरोधात काही कडक कारवाई करणार आहे की नाही अशी विचारणा होत आहे.

अकोटचे ज्येष्ठ आमदार प्रकाश भारसाकळे यांनी आपल्या जीवाला धोका असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही गँगस्टरकडून नव्हे, तर अकोटमधील पत्रकारांकडून आपली 'सुपारी' दिली जाऊ शकते, अशी भीती आमदारांनी व्यक्त केली आहे. या आरोपांमुळे

**ज्येष्ठ आमदार प्रकाश भारसाकळे यांचा गंभीर आरोप**
**मोरेच्या डझनभर गुन्ह्यांचा उल्लेख, पोलिस करतील काय तपास**




संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून, आता अकोला पोलीस अधीक्षक यावर काय पाऊल उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांनी गुरुवारी राज्य विधानसभेत गंभीर आरोप करत अकोटमधील स्वयंघोषित संपादक रविराज मोरे यांच्याविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव दाखल केला. 'मला बिष्णोई गँगकडून कोणतीही धमकी आलेली नाही; मात्र अकोटचा स्वयंघोषित संपादकच रविराज मोरे माझी सुपारी देत आहेत का ?' असा खळबळजनक सवाल त्यांनी सभागृहात उपस्थित केला. या विषयावर मुंबई, अकोट आणि अकोला पोलिस काही तपास करणार आहे की नाही अशी विचारणा आता सुरु झाली आहे. आमदार विधानसभेत सुपारी बाज लोकांमुळे त्रस्त असतील तर सामान्य जनतेला वाचविणार कोण अशी विचारणा होत आहे. आ. भारसाकळे यांनी दोन दिवसांपूर्वी हक्काभंगाची सूचना दिली होती.

त्यानंतर गुरुवारी सभागृहात निवेदन करत त्यांनी सांगितले की, 'मला बिष्णोई गँगपासून नव्हे तर अकोटमधील या स्वयंघोषित संपादक गँगपासून धोका आहे,' असे स्पष्ट करत त्यांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध कडक चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी सभागृहात केली. दरम्यान, या प्रकरणात तपास करुन कारवाई करु असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

### मोबाईल कॉल डिटेल तपासण्याची मागणी

या संपूर्ण प्रकरणात सत्य बाहेर आणण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या मोबाईलचे मागील एक वर्षाचे कॉल डिटेल तपासण्याची मागणीही पुढे येत आहे. त्यातून या कथित गँगमध्ये आणखी कोण सहभागी आहे, तसेच ब्लॅकमेलिंग व खंडणीसंदर्भातील व्यवहारांचे धागेदोरे समोर येऊ शकतात, अशी चर्चा शहरात रंगली आहे.आमदार प्रकाश भारसाकळे यांच्याविरुद्ध सातत्याने बातम्या प्रसारित करून जनसामान्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्यामागे अदृश्य शक्ती कार्यरत आहेत का, असा सवालही आता उपस्थित होऊ लागला आहे. पक्षातील किंवा जवळच्या वर्तुळातील कोण व्यक्ती यामागे आहे का? याबाबतही चर्चा सुरू आहे.

### डझनभर गुन्हे; तरीही मोकाट?

◆रविराज मोरे यांच्याविरुद्ध महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांची यादी पाहिल्यानंतर सामान्य नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची चर्चा अकोट शहरात सुरू आहे. डझनभर गुन्हे दाखल असतानाही संबंधित व्यक्तीविरुद्ध ठोस कारवाई का होत नाही, असा सवाल आ. भारसाकळे यांनी विधानसभेत उपस्थित केला. सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पैसे उकळणे आणि खोटे नियुक्तीपत्र देऊन फसवणूक केल्याचे आरोप पुढे येत आहेत. या प्रकारामुळे काही तरुण नैराश्यात गेल्याचे तर काही कुटुंबांची आर्थिक परिस्थिती गंभीर झाल्याचे बोलले जात आहे.

### बदनामीच्या धमक्या, खंडणीचा आरोप

काही पीडितांच्या म्हणण्यानुसार, विरोध केल्यास 'तुमची पेपरमध्ये बदनामी करीन, तुमच्यावर गलिच्छ आरोप लावीन,' अशा धमक्या दिल्या जात असल्याची चर्चा आहे. समाजात प्रतिष्ठा खराब होण्याच्या भीतीमुळे अनेक जण उघडपणे पुढे येण्यास टाळाटाळ करीत असल्याचे चित्र समोर येत आहे. काहींच्या मते, खोट्या व नाट्यमय बातम्या प्रसारित करून ब्लॅकमेलिंग व खंडणी उकळणे हा या प्रकारामागील मुख्य उद्देश असल्याचा आरोप आमदारांनी विधानसभेत मांडला आहे, विधानसभेत मांडलेल्या हक्कभंग कारवाई प्रस्तावामुळे नागरिकांकडून आमदार भारसाकळे यांचे आभार मानले जात आहे सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे हे एकमेव आमदार आहे अशी चर्चा अकोट तालुक्यात होत आहे.

## मध्य रेल्वेव्दारे सुट्ट्यांमध्ये 1 हजार 484 उन्हाळी गाड्या



प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** मध्य रेल्वे द्वारे उन्हाळ्यातील सुट्यांमधील गदर्दी लक्षात घेऊन १ हजार ४८४ उन्हाळी विशेष गाड्यांची घोषणा करण्यात आली. उन्हाळ्याच्या सुधामध्ये पर्यटन आणि धार्मिक स्थळांना भेटी देतात.

उन्हाळी सुट्टधामध्ये प्रवाशांच्या सुविधेकरीता रेल्वे व्दारे विशेष गाड्याची घोषणा करण्यात रेल्वेच्या या निर्णयामुळे आली. काही गाडया अकोला मार्गे धावणार असल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहेस्तं सध्ये वर्धामध्य रेल्वे द्वारे प्रवाशांना उन्हाळी सुट्टयात्यांच्या जवळच्याव्यक्तीअकोला मार्गे काही गाडयां आणि प्रियजनासोबत घालवता याव्यात यासाठी विविध ठिकाणी २ हजार ४८४ उन्हाळी विशेष गाड्याची घोषणा केली आहे. यामध्ये ७४९ आरक्षित आणि ७३१ अनारक्षित विशेष गाडधांचा समावेश आहे. या उन्हाळी विशेष गाड्यामध्ये मागणीनुसार आधीच चालवण्यात येणाऱ्या गाड्या आणि काही अतिरिक्त विशेष गाड्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील ठिकाणांसाठी विशेष रेल्वे सेवांमध्ये मुंबई, दौड सोलापूर, पुणे कोल्हापूर, नाशिक रोड बडनेरा आणि हडपसर-हरंगुळ दरम्यानच्या गाडधांचा समावेश आहे. महाराष्ट्राबाहेरील ठिकाणांसाठी विशेष रेल्वे सेवामध्ये मुंबई बलिया, मुंबई-गोरखपुर दोह कबुर आणि सोलापूर-कलबुर्गी अनकापल्ली दरम्यानच्या गावांचा समावेश आहे. या विशेष गाड्या प्रवाशांना त्यांच्या प्रवासाचे निद्योजन करण्यास मदत करतील प्रवाशांच्या सोयीसाठी आणि आरामासाठी, मध्य रेल्वेने प्रवासी सुविधा वाइकाया आहेत आणि आपल्या नेटवर्कमध्ये अनेक उपाययोजना राबवल्या आहेत या विशेष गाड्यांच्या वेळा आणि थांब्यांची सविस्तर माहिती लवकरच दिली जाईल.

## दिल्लीतील उत्तम नगर येथे तरुणाच्या हत्येचा निषेध

**◆ दोषींवर कारवाईची खाटिक समाजाची मागणी**

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** दिल्लीतील उत्तम नगर येथे २६ वर्षीय तरुणाच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ अकोला येथे खाटीक समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. सतुसेना आणि हिंदू खाटीक समाजाच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पंतप्रधानांच्या नावे निवेदन देण्यात आले. या वेळी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

दिल्लीतील उत्तम नगर परिसरात २६ वर्षीय खाटीक समाजातील एका तरुणाची अमानुष हत्या झाल्याच्या घटनेचा निषेध अकोला येथे करण्यात आला. या घटनेविरोधात सतुसेना आणि हिंदू खाटीक समाजाच्या वतीने अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध व्यक्त करण्यात आला. जिल्ह्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. यावेळी समाजाच्या वतीने पंतप्रधानांच्या नावे अकोला जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन दिले. निवेदनात संबंधित घटनेचा निषेध नोंदवत दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.या आंदोलनात अखिल भारतीय हिंदू खाटीक संघटना तसेच अकोला हिंदू खाटीक समितीचे संजय धनाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## होळकर कॉलनीत गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट ; सुदैवाने जीवितहानी टळली



वि प्रतिनिधी १३ मार्च

**अकोट :** शहरातील एमआयडीसी परिसरातील होळकर कॉलनीत गुरुवारी अचानक सात गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. स्फोट इतका तीव्र होता की त्याचा आवाज दूरवरपर्यंत ऐकू गेला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पु. अ. होळकर कॉलनीतील एका घरामध्ये ठेवलेले गॅस सिलेंडर अचानक स्फोट होऊन आगीची भीषण घटना घडली. काही क्षणातच एकामागून एक असे तब्बल सात सिलेंडर फुटल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्फोटामुळे घराचे मोठे नुकसान झाले असून आसपासच्या घरांच्या काचा फुटल्याची माहिती आहे.घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन व अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून गॅस गळतीमुळे स्फोट झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अचानक झालेल्या या भीषण स्फोटामुळे होळकर कॉलनी व आसपासच्या परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली होती.

## रिक्त जागांमुळे कामे प्रभावित

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** शहर तसेच जिल्ह्यातील विविध कार्यालयात रिक्त जागांमुळे कामे प्रभावित होत आहे. काही कार्यालये कर्मचारी नसल्याने बंद ठेवण्यात येत आहेत. याचा फटका मात्र नागरिकांना बसत आहे. शासकीय, निमशासकीय कार्यालयातील रिक्त जागांचा आढावा घेऊन जागा भराव्यात. जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल. त्यांचे प्रलंबित प्रकरणे मार्गी लागू शकतील. विशेषत: ग्रामीण भागातील नागरिकांना यामुळे त्रास होतो. हातातली कामे सोडून कार्यालयात संबंधित व्यक्ती नसल्यास त्यांचा हिरमोड होतो.

## अकोलेकरांनो सावधान ! कचरा टाकला तर आता खिसा होणार रिकामा

**◆ कचरा जाळल्यास थेट ५ हजार रुपये दंड**

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** स्वच्छ अकोला सुंदर अकोला करण्यासाठी आता अकोला महानगरपालिका ॲक्शन मोडमध्ये आली आहे. शहरात कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी महानगरपालिकेने नवीन दंडात्मक नियमावली जाहीर केली आहे. आता कचरा वर्गीकरण न करणाऱ्यांना आणि उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांना मोठा दंड भरावा लागणार आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता राखण्यासाठी मनपा प्रशासनाने कंबर कसली आहे. नगर विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार, शहरात कचरा फेकणे, कचरा न वेगळा करणे आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर आता कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.मनपाच्या नियमानुसार असा असेल दंडाची नियमावली जाहिर केली आहे. कचऱ्याचे वर्गीकरण म्हणजेच ओला आणि सुका न केल्यास सामान्य घर अथवा व्यावसायिक यांना पहिल्यांदा चुक केल्यास २०० रुपये दंड भरावा लागेल. त्यानंतर प्रत्येक वेळी ३०० रुपये दंड द्यावा लागेल. मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्यांना व तो सार्वजनिक ठिकाणी फेकणाऱ्यांना पहिल्यांदा ३००० रुपये, तर त्यानंतर तब्बल ९००० रुपये दंड आकारला जाईल. परिसरात किंवा उघड्यावर कचरा जाळल्यास थेट ५००० रुपये दंड आकारला जाईल. सभा किंवा समारंभ संपल्यानंतर ४ तासांच्या आत स्वच्छता न केल्यास, भरलेली स्वच्छता अनामत रक्कम जप्त केली जाणार आहे. अकोल्यातील सर्व नागरिक आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांनी कचरा व्यवस्थापनाच्या या नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा मनपाच्या स्वच्छता विभागाने दिला आहे. तुमचा परिसर स्वच्छ ठेवा आणि महापालिकेला सहकार्य करावे लागणार आहे. कारण आता तुमची एक चूक तुम्हाला महागात पडू शकते.

## शासकीय विश्रामगृहाचा पार्किंगसाठी वापर



प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** जनता भाजी बाजारात येणारे किंवा बसस्थानकात पाहुण्यांना सोडायला येणारे दुचाकी चारचाकी चालक शासकीय विश्रामगृहाचा पार्किंगसाठी वापर करीत आहेत. शनिवार रविवारी लोकांची वाहने मोठ्या संख्येने दिसतात. मध्यंतरी विश्रामगृहाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात आला होता. मात्र आता आव जाओ घर तुम्हारा अशी अवस्था झाली आहे.

शासकीय विश्रामगृहात पार्किंगसाठी जागा राहत नाही. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. अकोला शहरात पार्किंग समस्या अत्यंत गंभीर बनली आहे. लोकांना वाटेल तिथे वाहने उभी करतात. त्याला कसलाही धरबंद राहिला नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष द्यावे तसेच नियमबाह्य पार्किंगला आळा घालावा अशी मागणी केली जात आहे.

**CLASSIFIED**

**प्लॉट प्लॉट प्लॉट**
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या
३ सोप्या किस्ती ११ महिने
मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव ,
हनुमानगडी समोर , छत्री तलाव
रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही
आपल्या बजट मधे फक्त
१६,९९,९९९/- मधे नवीन
बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश
कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

**२ बीएचके फ्लॅट विकणे आहे**
सेकंड फ्लोअर, पूर्वमुखी, ८५०
स्क्वेअर फूट, सेमी फर्निश, स्वतंत्र
पार्किंग, हवेशीर प्रशस्त
४५ लाख निगोशिएबल,
'रचना पाम' वरदविनायक
अपार्टमेंट, गनेडीवाल लेआऊट,
क्यांम्प, अमरावती.
संपर्क
7038424614
9823077585

## गावखेड्यात चुली पेटल्या, शहरात सिलिंडरसाठी रांगा, अन् सरकार म्हणते गॅस टंचाई नाही !

**◆ जनता संभ्रमात : हॉटेल, मेस, खाणावळसह लघू व्यवसाय अडचणीत**

प्रतिनिधी १३ मार्च

**अकोला :** शहरातील कोणत्याही गॅस एजन्सीवर गेले तर सकाळपासूनच नागरिकांच्या सिलिंडर घेऊन रांगा लागलेल्या दिसून येतात. यापेक्षाही विपरीत परिस्थिती ग्रामीण भागात आहे. तेथे बहुतांश नागरिकांकडे एकच सिलिंडर असल्याने त्यांना चुली पेटविल्याशिवाय पर्याय नाही. आधी गावखेड्यात सिलिंडरच्या गाड्या फिरत असल्याने हातोहात सिलिंडर मिळत होते. त्यामुळे घरी इंधनाचा (जळतण) साठा करून ठेवला नाही. आता जंगलात इंधनासाठी भटकंती करण्याची वेळ आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तर दुसरीकडे सरकार म्हणते की गॅसची टंचाई नाही. मग ही जनतेची ससेहोलपट कशासाठी, असा अगतिक प्रश्न सर्वसामान्य जनता उपस्थित करीत आहे. सध्या जनता कमालीची संभ्रमावस्था असून,



संग्रहीत

त्यांच्यामध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. सध्याच्या परिस्थितीमुळे हॉटेल, खाणावळ, मेस सह लघू व्यवसाय कमालीचे अडचणीत आले असून, घरगुती गॅस टंचाईमुळे जनजीवनावरही परिणाम होत आहे.

इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल युद्धामुळे देशांमध्ये सर्वत्र ऊर्जा टंचाई जाणवत असताना केंद्रीय पेट्रोलियम खात्याने घरगुती वापरासाठी केरोसिन आणि हॉटेल-रेस्टॉरंटसाठी कोळशाचा तात्पुरता वापर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून सरकार काहीही म्हणत असले तरी सध्याच्या भीषण वास्तवाची जाणीव सर्वसामान्यांना झाली आहे. या निर्णयानुसार सरकारने राज्यांना नियमित १ लाख किलो लिटर कोट्याव्यतिरिक्त अधिक ४८,००० किलोलिटर केरोसिन घरगुती स्वयंपाकासाठी उपलब्ध करून दिले आहे. तसेच हॉटेल व खाद्य व्यवसायासाठी बायोमास, आरडीएफ पेलेट्स आणि कोळसा यांसारख्या पर्यायी इंधनांचा एक महिन्यासाठी वापर करण्याची परवानगी दिली आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी हे निर्णय जाहीर केले. यामुळे परिस्थिती गंभीर असल्याची कल्पना येते. गॅस तुटवड्यामुळे केवळ व्यावसायिकच नव्हे, तर त्यावर अवलंबून असणारे शेकडो कामगार आणि स्थानिक बाजारपेठ धोक्यात आल्याचे दिसू लागले आहे. राज्यात मुंबई, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, पुणे यासारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये ऊर्जा टंचाईचे धक्के बसू लागल्याचे गुरुवारी चित्र दिसत होते. ही भीती ग्रामीण भागातही पसरू लागल्याने अनेक छोटी उपाहारगृहे, हॉटेल, ढाबे, मेस यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण दिसू लागले आहे.

### गॅस बुकिंग प्रणालीवर येत आहे ताण

गॅस बुकिंगसाठी मोठ्या प्रमाणात कॉल येत असल्याने काही ठिकाणी बुकिंग प्रणालीवर ताण येत आहे. त्यांची बुकिंगची यादी व प्रतीक्षा यादी दिवसेंदिवस फुगत आहे. ग्रामीण भागात तर यापेक्षाही भयावह परिस्थिती असून, तालुक्याच्या स्तरावरच गॅस मिळत नाही तर गावखेड्या कोठून मिळणार, त्यामुळे त्यांना इंधन (लाकूड, गोवऱ्या) जमा करण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

### विद्यार्थ्यांमध्ये पसरली अस्वस्थता

शालेय पोषण आहारसारख्या सरकारी योजनांवरही इंधन टंचाईचा ताण येत आहे. त्यांचा शालेय पोषण आहारही धोक्यात आला आहे. शहरातील अनेक मेस बंद होण्याच्या मार्गावर असल्याने विद्यार्थ्यांमध्येही अस्वस्थता निर्माण झाली आहे. शहरात बहुतांश विद्यार्थी नीट, जेईईसह इतर अभ्यासक्रमाच्या शिकवणीसाठी आलेले आहेत. मेस बंद झाल्या तर काय? पुढे नीट, जेईईची परीक्षा असल्याने गावी जाऊनही राहत येत नसल्याने विद्यार्थ्यांसह पालकांना चिंतेने ग्रासले आहे.

### गॅस सिलिंडरसह केवायसीसाठीही रांगा!

पेट्रोलियम मंत्रालयाने एप्रिल २०२५ मध्येच गॅस कंपन्यांना ग्राहकांची केवायसी अद्ययावत करण्याचे निर्देश दिले होते. त्यासाठी ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतही दिली होती. मात्र याकडे गॅस कंपन्या व त्यांच्या वितरकांनी याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. त्याचा फटका आज ग्राहकांना बसत आहे. जवळपास अर्ध्या ग्राहकांची केवायसी बाकी असल्याने त्यांना गॅससाठी बुकिंग करताना अडचणी येत असून, त्यांचे बुकिंगच होत नाही. त्यामुळे त्यांना आता केवायसीसाठी एजन्सीसमोर रांगा लावाव्या लागत आहेत.

## गोपाल नगरमध्ये मुलाने केली वडिलांची हत्या

प्रतिनिधी १३ मार्च

**अमरावती :** दारूसाठी पैशावरून भांडण झाल्याने गोपाल नगर मध्ये मुलाने वडिलांच्या डोक्यावर काठीने मारून त्यांची हत्या केल्याची घटना राजापेठ ठाणे हद्दीतील गोपाल नगर येथे सकाळी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मधुकर बोरकर असे मृतकाचे नाव असून त्यांचा मुलगा आरोपी राहुल बोरकर याला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड दहशत पसरली पसरली असून पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK